७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १८ मार्च २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## आमदार मंदा म्हात्रे यांना हृदयविकाराचा झटका

मुंबई (दै. संध्या) : बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या आमदार मंदा म्हात्रे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांच्यावर मध्यरात्री तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली असून, त्यांची प्रकृती आता धोक्याबाहेर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मंदा म्हात्रे यांची काल रात्री प्रकृती खालावल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. तेथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर आवश्यक वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. सध्या त्यांना तज्ज्ञांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले असून सर्व वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल समाधानकारक आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून डॉक्टरांनी त्यांना काही दिवस सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## गावातच गाठून घेतला बदला

गोंदिया (दै. संध्या) : गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. 9 महिन्यांनी वडिलांच्या मारेकऱ्याचा बदला घेतल्याची घटना घडली आहे. वडिलांचा मारेकरी जामीनावर सुटून बाहेर आला होता, यावेळी गावातच गाठून मुलाने त्याचा बदला घेतला आहे. या घटनेनं महाराष्ट्र हादरला आहे. गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातील पालेवाडा इथं ही घटना घडली आहे. गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातील पालेवाडा हेटी येथे जुन्या वैमनस्यातून एका तरुणाची तलवारीने निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. भुरु उर्फ देवेंद्र ताराम (25) असे हत्या करण्यात आलेले तरुणाचे नाव आहे. 9 महिन्यांपूर्वी मृतक देवेंद्र याने आरोपी सुनील कांबळे याचे वडील आसाराम कांबळे याची जादूटोणाच्या संशयातून हत्या केली होती. 8 दिवसांपूर्वी जामिनावर तुरुंगातून सुटल्यानंतर मृतक देवेंद्र हा आपल्या गावी परतला होता. मृतक देवेंद्र गावात परत आल्याचे कळताच आरोपी सुनील याने आपल्या वडिलांच्या हत्येचा बदला घेण्याचा चंग बांधला होता. त्याने संधी साधून मृतक देवेंद्रला गावातच पकडले व तलवारीने सपासप वार केले. मान, हात, पाय आणि पोटाला झालेल्या गंभीर जखमांमुळं देवेंद्रचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपी सुनील कांबळे याने पोलीस पाटलांसमोर समर्पण केले. याप्रकरणी गोरेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरु आहे.

## राहुल गांधींच्या वादग्रस्त भाषणाची सीडी मागितली

पुणे (दै. संध्या) : लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लंडनमध्ये केलेल्या भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल बदनामीकारक वक्तव्य केल्याप्रकरणात 'सीडी' हा महत्त्वाचा तांत्रिक पुरावा असल्याने त्याची प्रत देण्याची मागणी बचाव पक्षाने केली होती. मात्र, सीडीऐवजी पेन ड्राईव्ह देण्यात आल्याचे फिर्यादींनी मंगळवारी ( दि. 17) उलट तपासात मान्य केले असल्याची माहिती राहुल गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद पवार यांनी दिली. राहुल गांधी यांनी मार्च २०२३ मध्ये लंडनमधील अनिवासी भारतीयांसमोर भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक विधान केले होते. त्यामुळे सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे. पुण्यातील एमपीएमएलए विशेष न्यायालयात या दाव्याची सुनावणी सुरू आहे. राहुल गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार यांच्याकडून फिर्यादी सात्यकी सावरकर यांची उलट तपासणी चालू आहे. या प्रकरणात उलट तपासादरम्यान ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार यांनी विविध तांत्रिक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले. त्यावेळी फिर्यादींकडून काही महत्त्वाच्या बाबी मान्य करण्यात आल्या. न्यायालयात यापूर्वी सादर करण्यात आलेली भाषणाची सीडी तपासल्यावर ती ब्लँक (रिकामी) असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, याच सीडीच्या आधारे राहुल गांधी यांना समन्स बजाविण्यात आले होते. मात्र, सीडीऐवजी पेन ड्राईव्ह देण्यात आल्याचे फिर्यादींनी सांगितले.

# पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




मुंबई (दै. संध्या)

'पाणी फाउंडेशन' ने महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या फाउंडेशनने राज्य शासनाच्या समवेत राज्याला बसणाऱ्या दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात मदत केली. यापुढेही पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत पाणी फाउंडेशनच्या जलसंधारण कामाच्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

बैठकीस कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग, पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमिर खान, किरण राव, पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, तसेच अमित चंद्रा, विलास शिंदे आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषी विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विषयक संशोधन करणाऱ्या विविध संस्थांनी यावर्षी एल निनोचा प्रभाव जाणवणार असल्याचे मत व्यक्त केले आहे त्यामुळे राज्यात ८० टक्के पाऊस होईल, असे गृहीत धरून जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे. पाणी फाउंडेशनच्या मागील कामाचा अनुभव बघता त्यांच्या माध्यमातून यावर्षीही शेतकरी, ग्रामस्थ जलसाक्षर होतील.

पाण्याचे महत्व ओळखून फाउंडेशन काम करत आहे. या कामासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी फाउंडेशनला मदत करावी. त्यासाठी पूरक यंत्रणा सज्ज ठेवावी. फाउंडेशन राज्यात करीत असलेल्या जलसंधारणाच्या कामांमध्ये मृद व जलसंधारण विभागाचाही समावेश करावा. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून होत असलेल्या कामाचा दर्जा चांगला राखण्यासाठी, त्यांच्या मागणीनुसार नियंत्रण आणि पडताळणी यंत्रणेची आवश्यकता आहे. यासाठी कृषी सहायक तसेच ग्रामविकास विभागाच्या उमेद अभियानामधील कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली व्यवस्था उभारण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीत पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सादरीकरण केले. यावेळी संस्थापक आमिर खान, किरण राव, अमित चंद्रा यांनीही जलसंधारणाची कामे प्रभावी होण्यासाठी मते व्यक्त केली.

फाउंडेशनने राज्यामध्ये स्वयंसेवक तत्त्वावर १३ हजार १२१ शासकीय अधिकाऱ्याचे मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. तसेच फार्मर कप निवासी प्रशिक्षणासाठी १६ हजार २६० शेतकरी सहभागी झाले आहेत. यामध्ये ५७.५६ टक्के महिला शेतकरी आहेत तसेच ११ हजार ९५ निमंत्रकांनी नोंदणी केली आहे.

## रब्बी हंगामातील 'ई-पीक' पाहणीला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ : बावनकुळे

नागपूर (दै. संध्या)



राज्यातील रब्बी हंगाम २०२५-२६ मधील 'ई-पीक पाहणी' करण्याची मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि.१७) विधानसभेत केली. बावनकुळे म्हणाले की, "२५ जानेवारी २०२६ पासून सहाय्यक स्तरावर ई-पीक पाहणीची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत रब्बी हंगामातील पिकांची केवळ ५५.६९ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ टक्के शेतकरी या नोंदणी प्रक्रियेपासून लांब आहेत. ही नोंदणी १०० टक्के पूर्ण व्हावी, या हेतूने सरकारने मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पीक विम्यासह सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे." जमाबंदी आयुक्त आणि कृषी आयुक्त यांनी समन्वयाने काम करून 'ॲग्री स्टॅक' मधील डेटाची नोंदणी तातडीने पूर्ण करावी," अशी सूचना प्रशासनाला केली असल्याचे सांगून बावनकुळे म्हणाले की, पीक पाहणीची पडताळणी अचूक आणि वेळेत व्हावी, यासाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे.

## कल्याण ते सीएसएमटी सर्व लोकल १५ डब्यांच्या करा

नवी दिल्ली (दै. संध्या)

- शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची लोकसभेत मागणी
- रेल्वेच्या प्रत्येक स्टेशन्सवर मराठी साहित्य विक्रीचे स्टॉल्स सुरु करा
- राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी बजेटमध्ये २३ हजार कोटी दिल्याबद्दल मानले आभार



मध्य रेल्वेवरील कल्याण ते सीएसएमटी सर्व लोकल १५ डब्यांच्या करणे, प्लॅटफॉर्मचे रुंदीकरण, दिवा सीएसएमटी जलद लोकल, कोपर-वसई रेल्वेच्या फेऱ्या वाढवणे, कळवा-ऐरोली एलिव्हेटेड प्रकल्पाला गती आणि प्रत्येक स्टेशन्सवर मराठी साहित्य विक्रीचे स्टॉल्स सुरु करावेत, अशा रेल्वेसंबधींच्या अनेक मागण्यांचे निवेदन आज शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी लोकसभेत सादर केले. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, कल्याण मतदार संघातील ८० टक्के प्रवासी लोकलचा वापर करतात. त्यामुळे कल्याण मार्गावर सर्व लोकल १५ डब्यांच्या करणे आवश्यक आहे. कोकण मार्गावरील मेल एक्सप्रेस फेऱ्यांची संख्या वाढवणे आणि ज्येष्ठ नागरिक आणि पत्रकारांची सुविधा पुन्हा सुरु करावी, अशी मागणी खासदार डॉ. शिंदे यांनी केली. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, कल्याण लोकसभा मतदार संघात आजच्या घडीला ५ ते ६ हजार कोटींची रेल्वेची कामे सुरु आहेत. पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिकेसाठी येथील प्रवाशी १५ ते २० वर्षांपासून वाट पाहत होते. २०१४ मध्ये केंद्रात भाजपप्रणित एनडीए सरकार सत्तेत आले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात कल्याण मतदार संघातील रेल्वेच्या कामांना गती मिळाली. आज ठाणे ते कल्याण पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले. तसेच कल्याण ते अंबरनाथपर्यंत तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम सुरु आहे.

## गॅस कनेक्शन बंद होण्याच्या बातम्यांवर सरकारचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली (दै. संध्या)

- सर्वांना e-KYCची गरज नाही; फक्त त्या लोकांनी करावे ज्यांचे रेकॉर्ड अपूर्ण आहे



केंद्र सरकारने त्या बातम्यांवर उत्तर दिले आहे ज्यात म्हटले जात होते की, जर ग्राहकांनी e-KYC केले नाही, तर त्यांचे गॅस कनेक्शन कापले जाईल. पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितले की, eKYC ची गरज फक्त त्याच ग्राहकांना आहे, ज्यांची पडताळणी अद्याप झालेली नाही. सरकारने सांगितले की, हा कोणताही नवीन नियम नाही. मंत्रालयाने सोशल मीडियावर जी माहिती दिली आहे, ती जुन्या मोहिमेचाच भाग आहे. याचा उद्देश फक्त एवढाच आहे की, जास्तीत जास्त गॅस ग्राहकांनी आपली बायोमेट्रिक पडताळणी करून घ्यावी, जेणेकरून सिस्टीममध्ये फसवणूक (फर्जीवाडा) होऊ नये.

जर तुम्ही सामान्य एलपीजी ग्राहक असाल आणि तुम्ही यापूर्वी तुमचे eKYC केले असेल, तर तुम्हाला ही प्रक्रिया पुन्हा करण्याची अजिबात गरज नाही. हा नियम फक्त अशा लोकांसाठी लागू आहे ज्यांचे रेकॉर्ड अद्याप अपडेट झालेले नाही.

उज्ज्वला योजनेच्या ग्राहकांसाठी नियम थोडे वेगळे आहेत. या ग्राहकांना प्रत्येक आर्थिक वर्षात किमान एकदा बायोमेट्रिक पडताळणी करावी लागते. ही पडताळणी देखील फक्त त्या उज्ज्वला ग्राहकांसाठी आवश्यक आहे जे वर्षातून 7 सिलेंडर घेतल्यानंतर 8व्या आणि 9व्या रिफिलवर मिळणाऱ्या लक्षित DBT सबसिडीचा लाभ घेऊ इच्छितात. ग्राहकांना बायोमेट्रिक प्रमाणीकरणासाठी गॅस एजन्सीमध्ये जाण्याची गरज नाही. मंत्रालयाने सांगितले की, eKYC प्रक्रिया घरी बसून सहज आणि विनामूल्य पूर्ण केली जाऊ शकते. ग्राहक संबंधित गॅस कंपनीच्या मोबाइल ॲपद्वारे हे स्वतःच पूर्ण करू शकतात. eKYC साठी फक्त 'आधार कार्ड' आणि 'नोंदणीकृत मोबाइल नंबर'चीच आवश्यकता असते. सरकारचे म्हणणे आहे की eKYC करण्याचा मुख्य उद्देश प्रणालीमध्ये पारदर्शकता आणणे हा आहे. यामुळे 'घोस्ट कंझ्युमर्स' म्हणजे दुसऱ्याच्या नावावर असलेल्या बनावट गॅस कनेक्शनना हटवण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, यामुळे एलपीजीचा काळाबाजार रोखण्यासही मदत होईल. सर्वोच्च न्यायालयाच्या 2018 च्या निर्णयानुसार, सरकार फक्त त्याच सेवा किंवा फायद्यांसाठी आधार अनिवार्य करू शकते, जिथे पैसे थेट सबसिडीच्या स्वरूपात दिले जात असतील. गॅस कनेक्शन स्वतःच कोणतीही सबसिडी नाही. कोणीही बाजारातील दराने कनेक्शन घेऊ शकतो आणि कोट्यवधी लोक कोणत्याही सरकारी मदतीशिवाय पूर्ण किंमत देऊन गॅस खरेदी करतात.

## सहावीतील मुलीवर ॲसिड हल्ला, अहिल्यानगर हादरलं

अहिल्यानगर (दै. संध्या)



साईबाबांचं जगप्रसिद्ध तिर्थक्षेत्र असलेल्या शिर्डीतील लोणी गावात संतापजनक घटना घडली असून शाळेत शिकणाऱ्या 13 वर्षांच्या चिमुकलीवर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. या घटनेनं अहिल्यानगर जिल्हा हादरला असून थेट विधिमंडळात याचे पडसाद पाहायला मिळत आहेत. शिर्डीतील घटना अत्यंत निंदानजनक असून राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही, असा सवाल आमदार नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. तर, मंत्री आदिती तटकरे, आमदार मनिषा कायंदे यांनीही या घटनेवरुन तीव्र संताप व्यक्त करत आरोपीला सोडलं जाणार नाही, असे सांगितले. आता, अहिल्यानगरचे पालकमंत्री तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घटनेवर प्रतिक्रिया दिलीय. शिर्डीतील ॲसिड हल्ला प्रकरणाची मी माहिती घेतली आहे, 13 वर्षाची मुलगी आहे, रस्त्यावर थांबून त्या मुलाने तिच्यावर ॲसिड फेकलं. खरंतर ग्रामीण भाग आहे, त्याच्यामुळे तिथे जवळपास सीसीटीव्ही नाहीत. पण हा मुलगा गावातलाच असू शकतो, त्यामुळे पोलिसांचा तपास जलद गतीने सुरू आहे. पोलीस कसून तपास करत आहेत.

# गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई : छगन भुजबळ

मुंबई (दै. संध्या)



अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे भारतात उद्भवलेल्या ऊर्जा संकटामुळे एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, नागरिकांना सिलिंडरसाठी ताटकळत रांगा लावाव्या लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, गॅसचा तुटवडा रोखण्यासाठी सरकारने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून राज्यात कुठेही टंचाई निर्माण होणार नाही, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. या संदर्भात अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत महत्त्वाची माहिती दिली आहे. तसेच गॅस सिलिंडरचा अवैध वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे. विधानसभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले, अचानक जी परिस्थिती निर्माण झाली, २८ फेब्रुवारीची जी लढाई सुरू झाली, त्याच्या आधी सुद्धा असे वाटत नव्हते की लढाई सुरू होईल आणि तेल साठ्यावर परिणाम होईल. परंतु, लढाई सुरू झाल्यानंतर आपण पाहिले की तिथल्या खाडीतून येणारे जे जहाज आहेत, त्यावर बंदी आली. गल्फ देशातून सुद्धा येणारे तेल बंद झाले. यातून सुद्धा भारत सरकारने मार्ग काढला आहे. रशियामधून तेल सुरू झाले, व्हेनेझुएलामधून सुरू झाले, अजून कुठून कुठून जेवढे तेल लागणार आहे ते मिळवणे सुरू झाले. 3-4 जहाजे आपली आली सुद्धा आहेत. इराणने देखील स्पष्ट केले आहे की आम्ही जहाज आमच्या शत्रूंचे अडवणार आहोत. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, पूर्ववत परिस्थितीवर यायला थोडा अवधी लागणार हे निश्चित. अनेक ठिकाणी लोक घरात सिलिंडर असून अजून 2-4 सिलिंडर आणून ठेवत आहेत. तसेच जे कोणी अवैध पद्धतीने गॅस सिलिंडर आणत आहेत त्यांच्यावर कारवाई देखील केली जात आहे. अनेक ठिकाणी तपासणी सुरू झाली आहे. भारत सरकारने देखील वेळोवेळी सांगितले आहे की एलपीजी, पीएनजी या गॅसचा साठा आमच्याकडे भरपूर आहे, त्याची काळजी करू नका. निवेदन सादर करताना छगन भुजबळ म्हणाले, पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांचे दर निश्चित करणे या बाबी केंद्र शासनाच्या आखत्यारीत आहेत. राज्य शासन पेट्रोलियम पदार्थांच्या किमती निर्धारित करण्यास अधिकृत नाहीत. तथापि, राज्यातील नागरिकांना अखंड व सुरळीत पुरवठा होण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. केंद्र शासनाचे 9 मार्च 2026 च्या आदेशान्वये, एलपीजीचा पुरवठा फक्त घरगुती वापरासाठी पुरवण्याचे आदेश तेल कंपन्यांना देण्यात आले आहे. तसेच प्रोपेन, ब्युटेन या सारखे पदार्थ केवळ एलपीजी निर्मितीसाठीच वापरण्याचे देखील आदेश तेल कंपन्यांना दिले आहेत. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, केंद्र शासनाने मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत 7 मार्च 2026 पासून घरगुती व व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीमध्ये पुढील प्रमाणे वाढ केली आहे. घरगुती सिलिंडर- 852.50 रुपायांवरून 912.50 रुपये (60 रुपयांची वाढ) आणि व्यावसायिक सिलिंडर जे आहे ते 1720.50 रुपायांवरून 114.50 रुपये वाढ केलेली आहे.

## संपादकीय

# "...तुम्हा पुण्या-मुंबईकडच्या लोकांचं काय बाबा!"

"तुम्हा पुण्या-मुंबईकडच्या लोकांचं काय बाबा!" अशी किंचित असूयायुक्त अप्रूपाची एक झाक महाशहरांच्या बाहेरच्या लोकांच्या बोलण्यात असते. त्या असूयेचं मूळ कशात असतं? तर ते सुरळीत आणि सुसज्ज अशा यंत्रणांची कायमस्वरूपी उपलब्धता गृहीत धरता येणं, या महाशहरांच्या वैशिष्ट्यात असतं. लोडशेडिंग होईल म्हणून घाईनं कामं आटपावी न लागणं, पाणी भरण्याचं प्रचंड कष्टप्रद काम करावं न लागता नळ सोडला की पाण्याची धार पडू लागणं, मैलोनमैल चालावं न लागता बस-ट्रेन वा रिक्षा-टॅक्सीसारखी वेगवान आणि स्वस्त सार्वजनिक वाहतूक सर्वांना उपलब्ध असणं... या तर मूलभूत गोष्टी झाल्या. पण मनोरंजनापासून वैद्यकीय सुविधांपर्यंत अनेक संदर्भात हे लागू होईल. शहरातल्या माणसांना अनेक गोष्टी सहजासहजी आणि सतत उपलब्ध असतात. याचा अर्थ सदासर्वकाळ सगळे जण सगळ्या गोष्टी उपभोगत असतात असं नव्हे. गरज पडली तर कुठल्याही संघर्षाशिवाय हे मिळेल, अशी खात्री त्यांना असते. या सदासर्वकाळ उपलब्धतेमुळे माणसं सैलावतात. ज्यांचं लहानपण पाण्याच्या अभावात गेलं आहे, अशी माणसं बारमाही पाणी असलेल्या ठिकाणी वास्तव्याला गेली, तरी काही काळ त्यांचा त्या वैपुल्यावर विश्वासच बसत नाही. जमेल त्या प्रत्येक भांड्यात जमेल तेव्हा जमेल तितकं पाणी भरून ठेवणं आणि दुसऱ्या दिवशी ते ओतून टाकून पुन्हा भरणं, असा अव्यापारेषु व्यापार ती करत राहतात. यंत्रणांच्या उपलब्धतेवर विश्वास ठेवण्याजोगी परिस्थिती त्यांनी कधी अनुभवलेलीच नसते. त्यातून हे वागणं येतं. त्यावर तर्काचा इलाज चालत नाही. मात्र एखाद्या नेटक्या शहरात जन्मलेल्या माणसांच्या वर्तनात याचा लवलेशही नसतो. बॉलीवूड वा क्रिकेटमधल्या सेलिब्रिटीजचं अप्रूप न बाळगता आपापले व्यवहार चालू ठेवणारे मुंबईकर; रिक्षाच्या तळावर रांग धरली की रिक्षा मिळणार या खात्रीनं घाईगडबड न करता बसमधून शांतपणे उतरणारे म्हैसूरकर; सकाळी सातच्या ठोक्याला स्टेशनवरच्या बेकरीत ताजा नाश्ता मिळणार या खात्रीनं उपाशीपोटी ऑफिसला निघणारा पॅरिसकर; चाकाची खुर्ची स्वतःची स्वतः नेता येईल असे उतार शहरभर असणार आणि ते नीट राखलेले असणार या खात्रीनं लंडनमध्ये स्वावलंबीपणे फिरणारे वृद्ध आणि अपंग लंडनकर... ही सगळी त्यांचीच उदाहरणं. हे सगळे लोक एक प्रकारची सुरक्षित, रिलॅक्स्ड, उदार मनोवस्था अनुभवत असतात. त्यांना निदान या व्यवस्थांच्या बाबतीत तरी वखवख वा असुरक्षितता नसते. जी शहरं भांडवलशाहीच्या प्राथमिक पायरीचं लक्षण आणि अंतिम पायरीची खूण मानली जातात, त्यांनीच तृप्त आणि उदार सहजीवनाचं हे प्रारूप उभं करावं हे विसंगत आणि मजेशीर आहे खरं, पण त्यातच शहर नावाच्या व्यवस्थेतली सगळी गंमत दडलेली आहे. 'गावाकडची निर्मळ-ताजी हवा आणि घरच्या मळ्यातला सेंद्रिय भाजीपाला' यांचे गुण गाताना न थकणाऱ्या लोकांनाही त्याचं आकर्षण असतं. अर्थात हे चित्र एका आदर्श शहराचं आहे. अशी निरामय, सहज – आणि मुख्य समतादर्शक समृद्धी कमावली, तर आणि तरच आपण खऱ्या अर्थानं शहरं होऊ हे वेगानं बकाल होत त्यालाच 'विकास' मानणाऱ्या गावांना कळलं आहे का?



## संस्कृत सुभाषित

अमित्रो मित्रता याति मित्रं चापि प्रदुष्यति
सामर्थ्य योगात्कार्याणामनित्या वै सदा गति ।।
(शांतीपर्व, अध्याय १३८, १३, महाभारत)

अर्थ – कार्याच्या महत्त्वाच्या मानाने शत्रूही मित्र होतात व मित्रही शत्रू होतात. कारण कोणतीही ास्थिती कायमची नसते.

## गुरु वचन

### पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले.

हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते.ते जोराने ओरडू लागले.

हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या.आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे.असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे , ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे.दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील. त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला फैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला. घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब ! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस. आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा,हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

## पंचांग

| | |
|---|---|
| १८ मार्च २०२६ | योग:शुभ २८:००:४६+ |
| बुधवार | करण:शकुनि ०८:२५:४० |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:चतुष्पाद |
| फाल्गुन शके | १९:४३:२५ |
| संवत्– १९४७ | सूर्य:मीन |
| संवत्सर – व्रिावसूनाम | चन्द्र:मीन२३:३५:४९ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – रमजान |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – २८ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:चतुर्दशी ०८:२५:४० | दर्श अमावास्या |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | शहाजीराजे भोसले |
| २९:२०:५४+ | जयंती (तारेखप्रमाणे) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | 5 | | | | 9 | 3 |
| 6 | 5 | | | 7 | | 1 | 8 | |
| 3 | | | | | | | | |
| | 8 | 7 | 3 | 9 | | 4 | | |
| 4 | | 5 | | | | 6 | | 9 |
| | | 9 | | 5 | 1 | 3 | 7 | |
| | | | | | | | | 1 |
| | 7 | 3 | | 1 | | | 4 | 5 |
| 5 | 2 | | | | 9 | 8 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 1 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 6 |
| 8 | 5 | 4 | 6 | 2 | 7 | 9 | 1 | 3 |
| 9 | 6 | 2 | 1 | 5 | 3 | 4 | 7 | 8 |
| 4 | 8 | 7 | 2 | 6 | 9 | 1 | 3 | 5 |
| 5 | 2 | 9 | 3 | 7 | 1 | 8 | 6 | 4 |
| 3 | 1 | 6 | 5 | 8 | 4 | 7 | 9 | 2 |
| 2 | 7 | 8 | 9 | 3 | 5 | 6 | 4 | 1 |
| 6 | 4 | 5 | 7 | 1 | 2 | 3 | 8 | 9 |
| 1 | 9 | 3 | 8 | 4 | 6 | 2 | 5 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३१ – पहिल्या इलेक्ट्रिक रेझरची निर्मिती. शिक् कंपनीने हे उत्पादन बाजारात आणले.
- १९४५ – सहा वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या प्रत्येक व्हाक्तीने युद्ध प्रयत्नात सक्रिय भाग घ्यावा, असा फतवा जपानमध्ये जारी करण्यात आला.
- १९४७ – ग्रेट ब्रिटनच्या राणीचे पती प्रिन्स फिलीप यांनी ब्रिटिश नागरिकत्व स्वीकारले.
- १९८९ – इंग्लंडमध्ये नॅशनल फॅट वुमेन्स असोसिएशनची स्थापना करण्यात आली.
- २००८ – सुपरहिट हिंदी चित्रपट 'ओम शांति ओम' चे संगीत दिग्दर्शक विशाल शेखर यांना हाँगकाँगमध्ये आयोजित केलेल्या आशियायी चित्रपट महोत्सवात सर्वश्रेष्ठ संगीतकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### राष्ट्रीय

- १९२२ – महात्मा गांधींना असहकार आंदोलनाबद्दल ६ वर्षे तुरुंगवास.
- २००२ – लोकसभेत पोटा (प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ॲक्ट,२००२) मंजूर करण्यात आला.
- २००८ – टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष रतन टाटा यांना आयआयटी खरगपूरने डॉक्टर ऑफ सायन्स(डीएससी) या मानद उपाधीने गौरविण्यात आले.

### जन्म

- १८३९ – ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान आर्थर नेव्हिल चेंबर्लिन यांचा जन्म.
- १८८१ – प्रसिद्ध नाटककार व पत्रकार वीर वामनराव जोशी यांचा जन्म.

### निधन

- ००३७ – रोमन सेनेटने सीझर तिबेरियसचे निधन पत्र अवैध ठरवले व कालिगुलाची सीझर पदी नियुक्ती केली.

## : SMS :

At the scene of an accident a man was crying: O God! I have lost my hand, oh! Sardar: Control yourself. DonÃ¢ï¿½ï¿½t cry. See that man. He has lost his head. Is he crying?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.३ | २२.२ |
| अहमदनगर | ३०.६ | २१.३ |
| अकोला | ३५.६ | २४.१ |
| अमरावती | ३५.१ | २४.८ |
| बीड | ३७.३ | २५.७ |
| भंडारा | ३६.७ | २४.२ |
| बुलढाणा | २८.२ | १३.८ |
| चंद्रपूर | ३७.१ | २६ |
| चेन्नई | ३५.७ | २१.९ |
| नवी दिल्ली | ३०.१ | १७.९ |
| धुळे | ३३.७ | २३ |
| गोंदिया | ३५ | २३.७ |
| जळगाव | ३५.४ | २३.२ |
| कोल्हापूर | ३१.९ | १९.२ |
| लातूर | ३३ | २२.९ |
| मुंबई | ३२.६ | २६.३ |
| नागपूर | ३४.९ | २४.१ |
| नांदेड | ३५ | २४.८ |
| नंदूरबार | ३१.६ | २३.१ |
| नाशिक | ३१.५ | १९.१ |
| पुणे | ३०.६ | १९.८ |
| पंढरपूर | ३३ | २३ |
| सातारा | ३२.४ | १८.३ |
| सांगली | ३३.३ | २० |
| सोलापूर | ३३.२ | २५.३ |
| वर्धा | ३६.१ | २५.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
आपला प्रभाव वाढल्याने शत्रू परेशान होतील. सर्व कामे वेळेत पूर्ण होतील.

**तुळ :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा : पूर्व
नोकरीत मनासारखी बदली किंवा पदोन्नती मिळण्याचे योग आहेत.

**वृषभ :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
बुद्धीच्या जोरावर अडचणींचा सामना कराल. कामाची समाजात, घरात स्तुती होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या प्रयत्नामुळे आपली स्थिती मजबूत कराल. कौटुंबिक सामजस्य राहील.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
कौटुंबिक तणाव वाढणार आहे त्यामुळे अजिविकामध्ये अडचणी येतील.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पूर्व
मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वडिलांच्या मार्गदर्शनाने व्यवसायातील अडचणी दूर होईल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर
संपत्ती संबंधीत असलेल्या कामात केलेली धावपळ फायदेशीर राहील. आर्थिक लाभ वाढणार आहे.

**मकर :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पूर्व
शत्रू आपल्या कामात बाधा आणण्याचा प्रयत्न करतील. मुलांच्या भविष्याची काळजी राहील.


**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
मागील काही दिवसांपासून अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण होतील. आपल्या प्रयत्नामुळे घरगुती वाद मिटणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर
सहकार्य व चांगले संबंध यामुळे आर्थिक लाभ होईल. अडकलेली कामे पूर्णत्वाकडे जातील. रागावर नियंत्रण ठेवा.

**कन्या :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
दांम्पत्य जीवनात कटुता येईल. रचनात्मक कामाचे फळ चांगले मिळेल.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: पश्चिम
आपल्या बुद्धीमत्तेची व दुरदर्शीपणाची समाजात स्तुती होईल. कार्यक्षेत्राचा विस्तार होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९०



### आडवे शब्द

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मत्र
१०. शर्त, पण
१२. फायदा, कल्याण
१३. जन्म
१४. माझे
१५. रमापती
१६. डग्याची साथीदार
१७. वाळा
१८. चांदणी
२०. सीतेला पळविणारा
२२. आवड, उत्कट इच्छा
२४. धातूचा धागा
२५. नरमच्या विरुद्ध
२७. भीमाजवळचे शस्त्र
२९. उथळ पाण्याचा आवाज
३०. नवरा (ग्रा.)
३१. 'रामचरित मानस' लिहिणारे
३३. कामदेव
३४. अंजन
३६. शहराचा भाग, पेठ, पूर्ण
३८. भारवाहक
३९. थंडावा
४०. सगळीकडे
४१. चलनवलन
४२. श्रीयुत
४४. व्यापारी फायदा
४६. पाप
४७. धाव, आघात
४९. वक्र
५२. आवरण
५४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५६. 'दिव्यावरील' अंधार!
५८. लिहिताना डावीकडे सोडलेली मोकळी जागा
५९. साखळी असलेला दिवा
६०. जंगला
६२. मैत्रीण
६३. निकट, जवळ
६५. गुल होणारा दिवा!
६६. समशेर
६९. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७०. कायदेशीर नसलेले
७२. स्त्री भूत
७३. नड, आवश्यकता
७४. डाकुंचा प्रमुख
७५. अंगरखा
७७. आंध्रमधून आलेली भटकी जमात
७८. नमस्कार
८१. झोपेचे खोबरे
८२. रात्रीचा पाऊस
८३. वस्तू निर्मितीची जागा

### उभे शब्द

१. धनको, धनवान
२. बाई, स्त्री
३.सांगलीतील पूर्वीचे संस्थान
४. सुकुमार, ५. अंत:करण
७. बस्तान
८. मृत्यूचा राजा
९. मृत्यू
१०. सेपे नसलेले
११. चेष्टा
१७. अफूचे बीज
१९. संतापी
२१. आशीर्वाद
२३. मायेची सावली
२५. मनोरंजन करणारा
२६. भालप्रदेश
२७. विटी–दांडूचा खड्डा
२८. विदुराला हिणवताना वापरले गेलेले संबोधन
३१. मंजिऱ्यांचे रोपटे
३२. बायको (सं.)
३३. स्निग्ध औषध
३५. भारतीय सैनिक
३७. भविष्यकथनासाठी उपयोगी मानला जाणारा मणी
३८. मिठाईचा एक प्रकार
३९. गाणे म्हणणारा
४१. हस्तलाघव
४३. काहीजणांसाठी हे निद्रासन ठरते!
४५. बरगडी
४६. चौथा हिस्सा
४८. पहारेकरी
५०. दरोडा
५१. चर्चा, विचारविनिमय
५२. सत्व, ताकद
५३. अजून, जास्त
५५. वर–वधूची मिरवणूक
५७. जिम्मेदार
६१. समीक्षक
६२. रंग बदलणारा प्राणी
६४. गरजू, अडलेला
६७. मध्यस्थ
६८. फुकाची पायपीट
६९. सुसर
७०. हरभरा डाळीचे पीठ
७१. जेव्हा
७५. मैत्री
७६. सर्वसत्ताधीश, भूपती
७९. औषध
८०. संगीतातील पलटे

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८९ चे उत्तर

आडवे उत्तर: १.विदूषक ३.बातमीदार ७.पोचपावती ९.बोबडा १०.वेगवान १२.ललकारी १४.यंदा १५.चाकरचुकर १८.रतन २१.रटाळ २३.माकड २५.सरहद २९.अवसर ३१.हरामखोर ३२.कसाई ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.बाबा ४४.शकट ४६.टकटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कटोरा ५४.रक्तदान ५७ अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकाफडकी ६४.सम ६६.लट ६८.पदोपदी ६९.जनार्दन ७१.वाकडसर ७३.मोती ७४.कपटी ७५.गर्द ७६.रत

उभे उत्तर : १.विद्यालय २.षटकार ३.बाबत ४.तडा ५.दावेदार ६.रग ७.जनक ८.पाल चुकचुकणे ११.वाचाळ १३.रीतसर १६.रमा १७.कड १९.नर २०.खोट्या नाण्याचा आवाज २२.टालमटोला २४.घाव २६.हद्दपार २७.खारट २८.साईबाबा २९.अवस ३०.समीर ३१.हवन ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ४०.वनचर ४१.ईश ४२.बावरा ४३.कचरा ४५.कफन ४६.टक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.खट ५७.काकी ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६२.कालवा ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नग ७२.सर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



# बँकांनी कर्ज वितरणाचे उद्दिष्ट ३१ मार्च अखेर पूर्ण करावे

**पुणे (दै. संध्या) :**

■ अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत

■ बँकर्सची जिल्हा सल्लागार समिती बैठक संपन्न

जिल्ह्यातील सर्व बँकांनी वार्षिक पत आराखड्यानुसार पीक कर्ज तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत कर्ज वितरणाचे उद्दिष्ट 31 मार्च 2026 अखेर पूर्ण करावे, ग्रामीण भागातील नागरिकांची कर्ज प्रकरणे मंजुरीच्या अनुषंगाने सर्व बँकेने पाठपुरावा करावा, नागरिकांची होणारी आर्थिक फसवणूक टाळण्याकरिता बँकेने जनजागृतीपर मेळावे आयोजित करण्यासह समाज माध्यमांचा प्रभावी वापर करण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्ह्यातील बँकर्सची जिल्हा सल्लागार समिती (डी.सी.सी.) तसेच जिल्हास्तर आढावा समितीच्या (डी.एल.आर.सी.) आढावा बैठकीत अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी दिले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मान्यतेने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी भारतीय रिझर्व्ह बँकेचे सहायक महाप्रबंधक तथा जिल्हा अग्रणी अधिकारी अक्षय कोंडेकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे उपमहाप्रबंधक रामचंद्र रागिरी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक योगेश पाटील, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी, बँकांचे प्रतिनिधी उपस्थितीत होते.

श्री. राऊत म्हणाले, जिल्ह्यात प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पीएम विश्वकर्मा योजना, स्वनिधी योजना, स्टँड अप इंडिया आदी महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, स्वयंरोजगार, कौशल्य विकासाच्या अनुषंगाने बँकेकडे कर्जमागणीबाबत नागरिकांकडून प्रकरणे सादर करण्यात येतात, या प्रलंबित प्रकरणांचा विचार करता ती वेळेत मंजूर करण्याची कार्यवाही करावी. कर्ज मंजुरीच्या अनुषंगाने बँकांनी आपल्या शाखांच्या व्यवस्थापकांची बैठक घेऊन त्यांना कर्ज प्रकरणे मंजुरीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करावे. विविध योजनांच्या निकषांबाबतची माहिती अनुषंगाने बँक, तलाठी सजा आणि ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात माहिती माहिती प्रदशित करावी. कर्ज मंजूरीच्या अनुषंगाने कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याकडे विशेष लक्ष द्यावे, याप्रकरणी जिल्हा प्रशासनातील विविध विभागाची मदत घ्यावी, असेही ते म्हणाले. बैठकीत सन 2025-26 च्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याअंतर्गत उद्दिष्टाहून अधिक म्हणजे कर्ज वाटप करणाऱ्या बँकेचे अभिनंदन करण्यात आले. सार्वजनिक बँका, खासगी बँका तसेच व्यावसायिक बँकांनीही लवकरात लवकर उद्दिष्टपूर्ती करावी.

विविध योजनांचे लाभ देणे, सायबर फसवणुकीबाबत अद्यावत माहिती देऊन जनजागृती करणे आदींसाठी बँकांनी अधिकाधिक आर्थिक साक्षरता मेळावे आयोजित करावेत. स्वयंसहायता समुहाच्या महिलांना त्यात सहभागी करून घ्यावे, असेही अपर जिल्हाधिकारी श्री. राऊत म्हणाले. श्री. कोंडेकर म्हणाले, नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरण, स्वालंबन करण्याच्यादृष्टीने विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचे काम करावे. आगामी काळातसमाजातील शेवट्या घटकापर्यंत बँकीग सुविधा पोहोचविण्याकरिता प्रयत्न करावे, असे श्री. कोंडेकर म्हणाले. यावेळी जिल्हा अग्रणी व्यवस्थापक श्री. पाटील यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे कर्जवितरण तसेच अन्य बाबींविषयी माहिती दिली. यावेळी नाबार्डच्यावतीने तयार करण्यात आलेल्या पुणे जिल्हा-संभाव्यतायुक्त ऋण योजना-2026-27 अहवालाचे अनावरण करण्यात आले.

# समाविष्ट गावांतील कर आकारणीवर महापौरांची विशेष बैठक

## सभासदांची समिती स्थापन करण्याचा निर्णय

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीबाबत नागरिकांकडून येत असलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. ही बैठक सोमवारी (१६ मार्च) दुपारी शिवाजीनगर येथील परिमंडळ क्र. २ कार्यालयात पार पडली. बैठकीला गटनेते काका चव्हाण, सुभाष नाणेकर तसेच समाविष्ट गावांतील इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाकडून अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. आणि उपआयुक्त (कर आकारणी) रवी पवार उपस्थित होते. याशिवाय समाविष्ट गावांतील नागरिक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला मिळकतकर विभागाने समाविष्ट गावांमधील कर आकारणीसंदर्भात सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी विविध मुद्दे उपस्थित करत निवासी व बिगरनिवासी मिळकतींवर जास्त कर आकारणी होत असल्याची तक्रार मांडली. शेजारील गावांचा ए.आर.व्ही. विचारात न घेता कर आकारणी करण्यात आल्याचे तसेच ग्रामपंचायत पद्धतीप्रमाणे कर आकारणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. नागरिकांनी पायाभूत सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसताना महानगरपालिकेच्या प्रमाणे कर आकारणी करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. तसेच दंड, शास्ती आणि व्याजावर व्याज आकारणीबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला. नांदेड सिटी परिसरातील मिळकतींना स्वतंत्र सुविधा असतानाही कोणतीही विशेष कर सवलत देण्यात आलेली नसल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला.

यावर अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी कर आकारणी ही धोरणात्मक बाब असून महानगरपालिकेच्या मुख्य सभेने मंजूर केलेल्या ठरावांनुसारच ती करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. या धोरणामध्ये बदल करण्यासाठी मुख्य सभेचा नवीन ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर मंजुषा नागपुरे यांनी समाविष्ट गावांतील कर आकारणीच्या प्रश्नावर संबंधित सभासदांची एक समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. या समितीकडे सर्व संबंधितांनी आपली लेखी मते व सूचना सादर कराव्यात, त्यानंतर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. आवश्यक असल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शनही घेतले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच सन २०२६ च्या महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट गावांतील पायाभूत सुविधांसाठी अधिक तरतूद करण्याबाबत लेखी सूचना देण्याचे आवाहनही महापौरांनी केले. बैठकीच्या शेवटी गटनेते काका चव्हाण यांनी सर्व उपस्थितांच्या वतीने महापौरांचे आभार मानले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संयुक्त बैठक

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे महानगरपालिकेतर्फे दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केली जाते. यंदाच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जयंती मंडळांचे पदाधिकारी, पोलीस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक सोमवारी (दि. १६ मार्च २०२६) महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली.

या बैठकीस महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, नगरसेविका अनिता इंगळे, अर्चना जगताप, सपना छाजेड, नगरसेवक निलेश आल्हाट, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)च्या पक्षनेत्या हिमाली कांबळे यांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंती कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर विविध व्यवस्थांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जयंती मंडळांच्या सूचनांच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात सावली मंडप उभारणे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करणे, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करणे, मोबाईल व पोर्टेबल शौचालयांची व्यवस्था करणे तसेच पुरेशी प्रकाशयोजना व ध्वनी व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

उद्यान परिसरात १० ते १६ एप्रिलदरम्यान स्वच्छता राखण्यासाठी स्वतंत्र पथके तीन शिफ्टमध्ये नियुक्त करण्याचे, अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे तसेच पुतळ्याची नियमित स्वच्छता राखण्याचे आदेश देण्यात आले. उष्माघाताची शक्यता लक्षात घेऊन फिरता दवाखाना, दोन रुग्णवाहिका, डॉक्टर व सहाय्यक कर्मचारी नियुक्त करण्याचेही निर्देश देण्यात आले.

याशिवाय उद्यान परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवणे, नागरिकांच्या वाहनांसाठी पार्किंगची सोय करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, फुटपाथ दुरुस्त करणे आणि परिसरातील राडारोडा हटविण्याचे आदेश देण्यात आले. तसेच अग्निशामक दलाची गाडी आवश्यक उपकरणांसह तैनात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी सर्व संबंधित विभागांनी दिलेल्या सूचनांनुसार तयारी पूर्ण करून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश दिले. तसेच शहरातील सर्व वॉर्ड कार्यालयांनी आपल्या हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांजवळ स्वच्छता आणि आवश्यक व्यवस्था ठेवण्याचे आदेश देण्यात आले.



# केंद्रप्रमुख परीक्षेनंतर गुणपडताळणी; टीईटीची माहिती नोंदवण्याची संधी

**पुणे (दै. संध्या) :**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या समूह साधन समन्वयक (केंद्रप्रमुख) भरती परीक्षेत पात्र ठरलेल्या शिक्षक उमेदवारांना आता शिक्षक परीक्षेत (टीईटी-सीटीईटी) उत्तीर्ण असल्याची माहिती द्यावी लागणार आहे. त्यासाठी २१ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली असून, गुणपडताळणी करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत अर्ज करता येणार आहे. परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती दिली. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतील कार्यरत शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी 'समुह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५' आयोजित करण्यात आली. ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी तीन सत्रांत ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल १३ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आला. या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना केंद्रप्रमुख पदावरील नियुक्तीसाठी टीईटी किंवा सीटीईटी परीक्षेत उत्तीर्ण असल्याबाबत सर्वांत पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती https://mscepune.in/dtedola/KP2026info.aspx या दुव्यावर २१ मार्चपर्यंत भरायची आहे. ई-मेल, पत्र किंवा इतर माध्यमाद्वारे सादर केलेली माहिती ग्राह्य धरण्यात येणार नाही. या मुदतीनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ऑनलाइन परीक्षेतील गुणांची किंवा रिस्पॉन्सशीट उपलब्ध करून घेण्यासाठी ३१ मार्चपर्यंत https://mscepune.in/DTEDOLA/KP2026ResponseSheet.aspx या दुव्यावर अर्ज करावा लागणार आहे.

# वर्षानुवर्षे खुर्ची न सोडलेले 'सहकारसम्राट' आता बसणार कायमचे घरी?

**पुणे (दै. संध्या) :**

बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ नुसार आता राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक असल्यास संबंधित संचालकांना जिल्हा बँकेच्या पुढील निवडणुकीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. राज्याच्या सहकार मंत्रालयाने या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना दिले असल्याने वर्षानुवर्षे खुर्ची न सोडलेले राज्यातील 'सहकारसम्राट' आता कायमचे घरी बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्याच्या सहकार विभागाचे कक्ष अधिकारी सुधीर अमृते यांनी राज्याच्या सहकार आयुक्तांना नऊ मार्च रोजी पत्र पाठविले आहे.

त्यामध्ये त्यांनी बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५ नुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी संचालक म्हणून कार्यकाळ पूर्ण केला असेल, असे संचालक बँकेच्या पुढील निवडणुकीसाठी अपात्र असतील, असे अधिनियमात नमूद असल्याचे म्हटले आहे. याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेला राज्य सरकारने दहा फेब्रुवारी २०२५ पत्र पाठविण्यात आले. त्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने १८.फेब्रुवारी २०२६ रोजी सहमती दर्शविली आहे. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सहकार विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे संचालक यांना निर्देश देण्याच्या सूचना सहकार विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

# चांदणी चौक येथे स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी

*आंबेडकर जयंती पूर्वतयारी बैठकीत प्रस्ताव; जागा मिळाल्यास पुतळा देण्याची उमेश कांबळे यांची तयारी*

**पुणे (दै. संध्या) :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेत पूर्वतयारीसाठी विशेष बैठक पुणे महापालिकेत आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत चांदणी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे युवक राज्य संघटक उमेश कांबळे यांनी केली, तसेच जागा मिळाल्यास पुतळा देण्याची तयारी उमेश कांबळे यांनी दर्शविली.



या बैठकीला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम तसेच महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय नगरसेवक, पोलीस अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आंबेडकर चळवळीतील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, विविध मंडळांचे अध्यक्ष व सदस्य देखील उपस्थित होते.

बैठकीदरम्यान उपस्थितांना आपले मत मांडण्याची संधी देण्यात आली. त्यावेळी पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या दृष्टीने शहराचे पश्चिम प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या चांदणी चौक येथे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक आणि पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी बोलताना संबंधित उमेश कांबळे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेने यासाठी योग्य जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या 'विकास प्रतिष्ठान' संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा महानगरपालिकेला देण्याची तयारी आहे. या प्रस्तावाला उपस्थितांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मातृशक्तीच्या सन्मानाने महाराष्ट्र केसरी स्पर्धेला आज भव्य प्रारंभ; वाघोलीत उत्साह

पुणे (दैनिक संध्या) : वाघोली येथे आजपासून (१८ मार्च) सुरू झालेल्या ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनाला यंदा मातृशक्तीचा मान देण्यात आला असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयामुळे वाघोलीसह पंचक्रोशीतील महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग पाहायला मिळत आहे. स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आयोजित "मातृशक्ती जिंदाबाद" या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमात स्पर्धेचे नियोजन, महिलांचा सहभाग आणि विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. मालती गोगावले यांनी सांगितले की, स्पर्धेसाठी भव्य क्रीडांगण उभारण्यात आले असून महिलांसाठी विशेष गॅलरी तसेच दिव्यांगांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. सुसज्ज पार्किंग सुविधेमुळेही प्रेक्षकांना सोय होणार आहे. "यंदाची कुस्ती स्पर्धा मातृशक्ती गाजवणार," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पूजा सणस यांनी सांगितले की, स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते होत असून महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. तसेच स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट रिल, छायाचित्रण आणि सर्जनशील सादरीकरणासाठीही बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. सोनाली सातव आणि सुजाता सातव यांनी यंदाची स्पर्धा केवळ कुस्तीपुरती मर्यादित न राहता मातृशक्तीच्या सन्मानाचा उत्सव ठरणार असल्याचे सांगितले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्याचा निर्धार आयोजकांनी केला आहे. प्रियांका रामकृष्ण सातव यांनीही महिलांना आवाहन करत सांगितले की, "ही स्पर्धा म्हणजे आपल्या घरातील सण आहे. जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होऊन मुलांसह उपस्थित राहावे, जेणेकरून परंपरा आणि संस्कृतीचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचेल." या कार्यक्रमाला वाघोली परिसरातील अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा मातृशक्तीच्या सन्मानामुळे विशेष ठरणार असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# भविष्यातील कार्यस्थळांची नवी दिशा

## पुण्यातील बाणेर येथे फेदरलाइटचा १०,००० चौ. फूट अनुभव केंद्राचा शुभारंभ

**पुणे (दै. संध्या) :**

■ फेदरलाइट ग्रुपने बाणेर, पुणे येथे केले स्टेट-ऑफ-आर्ट अनुभव केन्द्राचे अनावरण

कार्यस्थळ आणि शैक्षणिक संस्थांसाठी फर्निचर उपाययोजनांमध्ये भारतातील विश्वासार्ह नाव असलेल्या फेदरलाइट कंपनीने पुण्यातील बाणेर येथे आपले नवीन विशेष अनुभव केंद्र सुरू केले आहे. या केंद्राच्या उद्घाटनामुळे पुणे तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सरकारी विभागांसाठी आधुनिक कार्यस्थळ रचना अनुभवण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

या सेंटर चे उद्घाटन पंचशील रियल्टीचे संचालक श्री. सागर चोर्डिया यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी फेदरलाइट समूहाचे व्यवस्थापकीय संचालक श्री मनोहर गोपाल, संचालक श्री लव जे. चेल्लार्म, सहसंचालक श्री किरण डी. चेल्लार्म आणि व्यवसाय प्रमुख श्री नितीन घाग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बाणेरच्या मध्यवर्ती भागात असलेले १०,००० चौ. फूटांचे हे अनुभव केंद्र फेदरलाइटच्या विविध कार्यस्थळ आणि शैक्षणिक फर्निचर उपायांचे सादरीकरण करते. यामध्ये आरामदायी बसण्याची व्यवस्था, सहकार्यपूर्ण कार्यालयीन रचना, तंत्रज्ञानयुक्त वर्गखोल्यांचे फर्निचर, प्रयोगशाळेतील टेबल, ग्रंथालय व्यवस्था, सभागृहातील आसन व्यवस्था तसेच सरकारी संस्थांसाठी विशेष उपाय यांचा समावेश आहे. आर्किटॅक्ट, उद्योग क्षेत्रातील अधिकारी, उद्योजक आणि खरेदी व्यवस्थापक यांना आधुनिक आणि अॅडाप्टिव्ह फर्निचर प्रत्यक्ष पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी या केंद्रातून मिळणार आहे.



फेदरलाईट ग्रुप आपल्या बॅनर, पुणे, महाराष्ट्रातील अनन्य एक्सपीरियन्स सेंटरचे भव्य उद्घाटन अभिमानाने जाहीर करीत आहे. १०,००० चौ. फुटामध्ये फैलावलेले हे अत्याधुनिक केंद्र कोड डिझाईन आर्किटेक्ट्सद्वारे डिझाईन केलेले आहे आणि कार्यक्षेत्र आणि शिक्षण वातावरणाचे भविष्य पुन्हा परिभाषित करण्यासाठी तयार केले आहे. याप्रसंगी बोलताना श्री मनोहर गोपाल म्हणाले,"पुण्यातील आमच्या नव्या अनुभव केंद्राद्वारे आम्ही उद्योग, शैक्षणिक संस्था, लघुउद्योजक, उद्योजक आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांना अधिक प्रभावी सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. सर्वांनी येथे येऊन आमच्या आधुनिक रचना पाहाव्यात आणि भविष्यातील कार्यस्थळांचे अनुभव घ्यावेत." फेदरलाइटची नवीन फर्निचर सिरीज आधुनिक आणि गतिमान कार्यसंस्कृती तसेच विद्यापीठांच्या गरजांना लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे. तंत्रज्ञानयुक्त क्लासरूम फर्निचर, कामासाठी आधुनिक वर्कस्टेशन्स, ध्वनीरोधक कार्यकक्ष, आरामदायी खुर्च्या आणि सहकार्यपूर्ण कामासाठी विशेष जागा यांचा यात समावेश आहे. प्रत्येक उत्पादन कार्यक्षमता, आराम आणि लवचिकता वाढवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. याबाबत बोलताना संचालक श्री लव जे. चेल्लार्म म्हणाले,"आज फर्निचर केवळ सजावटीचा भाग राहिलेला नाही. ते लोक कसे काम करतात, विचार करतात आणि संवाद साधतात याला दिशा देणारे महत्त्वाचे साधन बनले आहे.

आम्ही भविष्यासाठी तयार, लवचिक आणि सहज वापरता येतील अशी कार्यस्थळे तयार करण्यावर भर देत आहोत."

आजच्या संमिश्र कार्यपद्धती आणि आधुनिक शिक्षण प्रणालीमुळे फर्निचरची भूमिका केवळ उपयोगापुरती मर्यादित राहिलेली नाही. शांतपणे काम करण्यासाठी जागा, समूह चर्चेसाठी सहकार्य केंद्रे आणि अनौपचारिक संवादासाठी विश्रांती क्षेत्र अशी विविध गरज पूर्ण करणारी व्यवस्था आवश्यक झाली आहे. सहसंचालक श्री किरण जे. चेल्लार्म म्हणाले,"आमचे ग्राहक केवळ फर्निचर शोधत नाहीत, तर त्यांच्या कार्यसंस्कृतीला अभिव्यक्त करणारी साधने शोधत असतात. एकाग्रतेसाठी कक्ष असो किंवा सहकार्यपूर्ण फर्निचर प्रणाली - प्रत्येक घटकाचा उद्देश केवळ भौतिक स्वरूपापलीकडे असला पाहिजे." फेदरलाइटसाठी आरामदायी रचना अत्यंत महत्त्वाची आहे. कंपनी कंबरेला योग्य आधार देणारी आसन व्यवस्था, समायोज्य रचना आणि शरीराच्या हालचालींना अनुकूल डिझाइन यांना प्राधान्य देते. साध्या रेषा, सुटसुटीत आकार, नैसर्गिक प्रेरणेतून तयार केलेली रचना आणि शांत रंगसंगती या वैशिष्ट्यांमुळे आधुनिक अंतर्गत सजावटीशी सुसंगत वातावरण तयार होते. तसेच केबल व्यवस्थापन, मॉड्युलर रचना आणि जागेचा कार्यक्षम वापर यावरही विशेष लक्ष देण्यात आले आहे. शाश्वततेलाही फेदरलाइटच्या उत्पादन प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे. कंपनी जबाबदारीने मिळवलेल्या मालाचा वापर करते, कमी प्रदूषण निर्माण करणारी प्रक्रिया वापरते आणि सौरऊर्जेवर चालणाऱ्या कारखान्यांद्वारे कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा प्रयत्न करते. कंपनी जुन्या फर्निचरचे संकलन करून त्याचा पुनर्वापर करते, वापरायोग्य वस्तू शाळा व स्वयंसेवी संस्थांना देणगी म्हणून देते आणि वापरलेल्या कापडांपासून पिशव्या तयार करते. उत्पादन प्रक्रियेत दृष्टीदोष असलेल्या कर्मचाऱ्यांनाही रोजगार देऊन समावेशकतेला प्रोत्साहन दिले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणमधून हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे सदस्य व चाकण पतसंस्थेचे संचालक गोरक्षनाथ कांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्तात्रय भेगडे व मनीषा भेगडे यांच्या लग्न वाढदिवसाचे औचित्य साधून हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत देण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील चार मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीचे प्रत्येकी दहा हजार रूपये प्रमाणे ४ धनादेश संबंधित मुलांच्या पालकांकडे सुपूर्त करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक गोरक्षनाथ कांडगे, रोनक गोरे, बिपिन रासकर, प्रशांत गोलांडे, राजेंद्र शिंदे, माजी नगरसेवक प्रवीण गोरे, रोशन गोरे, सुधीर वाघ आदी यावेळी उपस्थित होते.




### वाल्हेत काँग्रेस कमिटीकडून निषेध आंदोलन

वाल्हे (दैनिक संध्या) : राजकीय चळवळीचे केंद्रबिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरंदर तालुक्यातील वाल्हे गावात काँग्रेस कमिटीकडून गॅसच्या किमतीत झालेली प्रचंड दरवाढ तसेच गॅस वितरण व्यवस्थेतील ढिसाळ नियोजन व राज्य शासनाने जाहीर केलेल्या शेतकऱ्यांच्या फसव्या कर्जमाफीच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांकडून आठवडे बाजाराचे औचित्य साधून येथील शहीद शंकर शिंदे चौकात शांततापूर्ण व संविधानात्मक मार्गाने आंदोलनास सुरवात करण्यात आली. या दरम्यान युवा नेते सुनील असवलीकर प्रा. सचिन दुर्गाडे यांसह काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र बरकडे काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष साहेबराव फडतरे सेवा दलाचे बापूसाहेब मोकाशी सामाजिक कार्यकर्ते ॲड. फत्तेसिंग पवार अतिश जगताप तसेच ॲड. किरण कुमठेकर माऊली बोराडे सूरज जगदाळे यांसह आदी कार्यकर्त्यांनी गॅस व शेती खतांची झालेली दरवाढ तसेच राज्य शासनाने अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली कर्जमाफी ही अक्षरशः फसवी असल्याचा आरोप करत केंद्र तसेच राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला तसेच सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. याप्रसंगी धनंजय ताकवले सतीश पवार दत्तात्रेय राऊत रमजान आतार गुलाब कुमठेकर दत्तात्रेय पांडकर पोलीस हवालदार भाऊसाहेब भोंगळे संतोष वाल्हेकर यांसह बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

### बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवामध्ये नांदेड जिल्ह्याला मिळणार प्रतिनिधित्व

■ बार कौन्सिलच्या इतिहासात प्रथमच नांदेड जिल्ह्याचे कोरले जाईल नाव

नांदेड (दैनिक संध्या) : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणूक २०२६ ही जाहीर झालेली असून येणाऱ्या २४ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होणार असून राज्यभरातील वकील बंधू,भगिनींच्या न्याय हक्कासाठी ही परिषद कार्य करत आलेली आहे.वर्तमानस्थितीत संपूर्ण राज्यातून ०५ महिला,१८ पुरूष अशा एकूण २३ जागांसाठी १५५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केलेले असून पात्र उमेदवारांची अंतिम सूची अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली आहे.मराठवाड्याच्या पूर्व भागातील नांदेड जिल्ह्यातून एकच उमेदवार पात्र ठरलेला असल्याने नांदेड जिल्ह्यातील वकील बांधवांची एकजूट दाखविण्याची खूपच महत्त्वाची,मोठी वेळ आणि सोनेरी संधी आलेली आहे.कारण आपल्या घरचा,हक्काचा व सदैव आपली कामे करणारा,सर्वांना समान मानुन न्याय देणारा माणूस निवडून देण्यासाठी आपण सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे.नांदेड जिल्ह्यातून उमेदवारी अर्ज दाखल करत पात्र ठरलेले अनुक्रमांक ६३ - ॲड. नितीन लक्ष्मणराव कागणे हे मृदू,स्मितभाषी,मनमिळावू,माजी जिल्हा सहाय्यक सरकारी वकील नांदेड व माजी जिल्हा सचिव अधिवक्ता संघ नांदेड हे असून त्यांना प्रशासकीय व वकील बांधवांच्या समस्यांचा दांडगा अभ्यास असल्याने निश्चितच वकील बंधू आणि भगिनींच्या पाठीशी सक्षमपणे खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून अनेकवेळेला ते नेहमी समोर आलेले आहेत.यावेळी जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ विधिज्ञ बांधवांनी तर पूर्णतः ॲड. नितीन कागणे यांना पुर्णपणे पाठिंबा जाहीर करत स्वतः जल्लोषात सहभाग नोंदवत निवडणूक प्रचारात आपल्या जिल्ह्यातील व्यक्तीला निवडून आणण्याबाबत ठाम भूमिका निभावलेली दिसत आहे.

### महाराष्ट्रातील 54 टक्के डिलिव्हरी पार्टनर्स ईव्हीच्या वापरासाठी उत्सुक

नांदेड (दैनिक संध्या) : फ्लिपकार्ट इंडिया या भारतातील होमग्रोन ई कॉमर्स बाजारपेठे तर्फे आज ' दि लास्ट माईल लीप: एम्पॉवरींग डिलिव्हरी फ्लीट्स टू ॲक्सलरेट इंडियाज इलेक्ट्रिक मोबिलिटी ट्रान्झिशन' या श्वेतपत्रिकेचे अनावरण केले, ही श्वेतपत्रिका म्हणजे संपूर्ण भारतातील ६००० हून अधिक विशमास्टर्स (डिलिव्हरी पार्टनर्स) चे केलेले सर्वेक्षण आहे. या अभ्यासातून असे दिसून आले की महाराष्ट्रातील डिलिव्हरी पार्टनर्स हे इलेक्ट्रिक वाहने चालवण्यास उत्सुक आहेत, फ्लिपकार्ट रिसर्चच्या सर्वेक्षणानुसार, सर्वेक्षण करण्यात आलेल्या पार्टनर्स पैकी ५४ टक्के लोकांनी ईव्हीचा वापर करण्यास उत्सुकता दर्शवली आहे. यातून हे अधोरेखित होते की हे राज्य इव्ही वाहतूकीसाठी उत्सूक असलेले राज्य बनले आहे. अभ्यासाअंती असे दिसून येते की डिलिव्हरी पार्टनर्स मध्ये ईव्हीच्या वापरासाठी खूपच उत्साह आहे. देशभरांतील प्रतिसाद देणाऱ्यांपैकी अंदाजे ४६ टक्के लोकांनी ईव्ही मध्ये बदल करण्यास अनुमोदन दिले आहे, यातून हे दिसते की कर्मचारी यासाठी खूपच उत्साही आहेत. पण, आजमितीस वापर खूपच कमी आहे, कारण संपूर्ण कर्मचाऱ्यांपैकी १४.३ टक्के डिलिव्हरी पार्टनर्स हे पेट्रोलवर चालणारी वाहने वापरत आहेत.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई - निविदा सूचना**

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड शहर मंडल, पुणे यांचेतर्फे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत ठेकेदारांकडून कार्यक्षेत्रातील **वीजयंत्रणा बळकटीकरण योजना (System Strengthening Scheme)** कामासाठी ई-निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा क्रमांक: **17/2025-2026** असून, निविदा किंमत **रु. 131.35 लाख** आहे. सदर निविदा **दि. 8 एप्रिल 2026 रोजी 14.00 वाजेपर्यंत** उपलब्ध असून निविदा भरण्याची अंतिम तारीख **8 एप्रिल 2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत** आहे. निविदेच्या अधिक माहितीसाठी https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

PRO/PZ/ 248/2025-26

**अधीक्षक अभियंता, गणेशखिंड शहर मंडल, पुणे**


# समाजाच्या जडणघडणीत महिला पत्रकारांचेही मोलाचे योगदान

## मंजुषा नागपुरे यांचे प्रतिपादन; पुणे श्रमिक पत्रकार संघ, रोटरी क्लब व फिक्की फ्लो पुणे चॅप्टरतर्फे महिला पत्रकारांचा सन्मान




पुणे (दै. संध्या) :

"विविध क्षेत्रात महिलांनी कर्तृत्वाने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. पत्रकारितेच्या आव्हानात्मक क्षेत्रातही महिला मागे नाहीत. कुटुंब व पत्रकारिता याचा समतोल साधत निर्भीडपणे भूमिका मांडून, समाजाच्या विविध घटकांचा आवाज त्या बनल्या आहेत. समाजाच्या जडणघडणीमध्ये महिला पत्रकारांचेही योगदान मोलाचे राहिले आहे," असे प्रतिपादन महापौर मंजुषा नागपुरे यांनी केले. महिला पत्रकारांना काम करताना येणारे अनुभव सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत, यासाठी एखादे सदर सुरु करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

पुणे श्रमिक पत्रकार संघ, रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईज, फिक्की फ्लो पुणे चॅप्टर आयोजित महिला सन्मान सोहळा २०२६ कार्यक्रमात नागपुरे बोलत होत्या. पत्रकार भवनात आयोजित कार्यक्रमावेळी फिक्की फ्लो पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा श्रीमती अनिता अग्रवाल, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजचे अध्यक्ष जीवराज चोले, संस्थापक सदस्य डॉ. सिमरन जेठवानी, सचिव तेजस्विनी थिटे आदी उपस्थित होते. विविध वृत्तपत्र व चॅनेल्समध्ये काम करणाऱ्या महिला पत्रकारांना यावेळी सन्मानित करण्यात आले. चैत्राली माजगावकर-भंडारी यांनी महिला पत्रकारांसाठी विविध खेळ आणि रंजक स्पर्धा घेतल्या.

श्रीमती मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "महिलांना समान संधी मिळू लागल्या आहेत. मिळालेल्या संधीचे सोने करत महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. या प्रवासात महिलांना पुरुषांचीही खंबीर साथ मिळत असून, सर्व क्षेत्रात उल्लेखनीय काम होत आहे. पत्रकारांचे आयुष्य धावपळीचे असते. त्यातही महिला पत्रकार असतील, तर घर, ऑफिस याचा समतोल साधताना तारेवरची कसरत होते. मात्र, तुम्ही सगळ्या जणी निर्भीडपणे व धीरोदात्तपणे ही जबाबदारी सांभाळत आहेत, याचे कौतुक वाटते."

अनिता अग्रवाल म्हणाल्या, "पत्रकारितेत महिलांनी दिलेले योगदान कौतुकास्पद आहे. स्वतःला सक्षम बनवून इतरांच्या समस्या मांडण्याचे काम तुम्ही करत असता. व्यावसायिक कामाबरोबरच कुटुंबाला, मुलांना वेळ देण्याचे कौशल्य महिलांच्या अंगी उपजत असते. फिक्की फ्लो पुणे चॅप्टरच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. भविष्यात महिला पत्रकारांसाठी चांगले उपक्रम राबविण्याचा मानस आहे."

ब्रिजमोहन पाटील म्हणाले, "घराची आणि ऑफिसची जबाबदारी लीलया सांभाळणाऱ्या महिला पत्रकार खऱ्या अर्थाने धुरंधर आहेत. समाजाच्या अडचणी सोडवताना त्यांच्या पत्रकारितेतील ममत्व भाव जागा असतो. त्यांच्या या कार्याचा यथोचित गौरव करण्याचा प्रयत्न या तीन संस्थांनी केला आहे."

जीवराज चोले यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. तनिष्का डोंगरे यांनी सूत्रसंचालन केले. मंगेश फल्ले यांनी आभार मानले.

## "गॅलेक्सी ऑफ पीसीसीओइ स्टार" चे शनिवारी प्रकाशन

पिंपरी, पुणे (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा सांगणारे "गॅलेक्सी ऑफ पीसीसीओइ स्टार" या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी, (दि.२१ मार्च) सकाळी १० वाजता, आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी मेळाव्यात होणार आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. यावेळी पीसीईटीचे उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ गिरीश देसाई पीसीसीओइ चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आदी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती पीसीईटीचे सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ.शितलकुमार रवंदळे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. पीसीसीओइ माजी विद्यार्थी संघटना आणि पीसीईटी सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग यांच्या वतीने आयोजित केलेल्या या माजी विद्यार्थी मेळाव्यास देश, परदेशात विविध क्षेत्रात नोकरी, उद्योग, व्यवसाय करणारे माजी विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

## कोक स्टुडिओ भारत सीझन ४ची घोषणा; नव्या कलाकारांसह विविधतेचा सुरेल मेळ




पुणे (दै. संध्या) :

देशभरातील संगीतप्रेमींमध्ये लोकप्रिय असलेला कोक स्टुडिओ भारत आपल्या चौथ्या सीझनसह परतला असून यंदाच्या सीझनसाठी कलाकारांची दमदार फळी जाहीर करण्यात आली आहे. 'द लिस्ट'च्या माध्यमातून या नव्या सीझनमधील कलाकारांची घोषणा करण्यात आली.

गेल्या तीन सीझनमध्ये आधुनिक आणि पारंपारिक संगीताचा सुरेख संगम सादर केल्यानंतर, यंदाचा सीझन भारतातील विविध प्रादेशिक संस्कृतींना अधिक ठळकपणे समोर आणणार आहे. राजस्थान, काश्मीर, बनारस आणि पंजाबसह देशातील विविध भागांतील लोकपरंपरा आणि संगीत शैली यांचा संगम या सीझनमध्ये अनुभवायला मिळणार आहे.

या सीझनमध्ये आदित्य रिखारी, कुतले खान, फहीम अब्दुल्ला, अर्सलान निझामी, मधुर शर्मा, वैभव पानी, मोहम्मद फैझ, रेखा भारद्वाज यांसारख्या अनेक नामांकित व नवोदित कलाकारांचा सहभाग असणार आहे. विविध पार्श्वभूमीतील हे कलाकार एकत्र येत संगीताला नवे रूप देणार आहेत.

या सीझनचे वैशिष्ट्य म्हणजे विविधता आणि प्रयोगशीलता. वैयक्तिक भावना, आठवणी, भक्ती आणि परंपरा यांचा संगम आधुनिक शैलीत मांडला जाणार आहे. प्रादेशिक कथा आणि संगीत जागतिक पातळीवर पोहोचवण्याचा प्रयत्न या मंचाद्वारे केला जात आहे.

गायिका रेखा भारद्वाज यांनी या मंचाचे कौतुक करत परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ असल्याचे सांगितले. तर आदित्य रिखारी यांनी या सीझनमधील संगीत अधिक व्यापक आणि प्रभावी असल्याचे नमूद केले.

कोका-कोला इंडियाचे अधिकारी शंतनू गंगाणे यांनी सांगितले की, कोक स्टुडिओ भारत हा मंच प्रादेशिक वारसा आणि समकालीन संगीत यांना एकत्र आणत असून सीझन ४ हा या प्रवासाला नवे उंचीवर नेणारा ठरेल.

डिजिटल पिढीसाठी खास तयार करण्यात आलेल्या या मंचावरून स्थानिक कथा, भाषा आणि पारंपारिक वाद्यांना आधुनिक संगीतासोबत जोडत नवे प्रयोग सादर केले जाणार आहेत. लवकरच या सीझनमधील पहिले गाणे प्रदर्शित होणार असून संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे.

## पीव्हीपीसीओएच्या वतीने आयोजित शिअरफोर्स स्पर्धेत विजयी सलामी

# ब्रिक्स कॉलेज, सीएके संघाचे विजय



पुणे (दै. संध्या) :

ब्रिक्स कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (बीसीओए), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर कोल्हापूर (सीएके)संघाने पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या (पीव्हीपीसीओए) वतीने आयोजित शिअरफोर्स स्पर्धेतील फुटबॉलमध्ये आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली.

शिवाजीनगर येथील ॲग्रीकल्चर कॉलेजच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेचे उद्घाटन पुणे जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष ललित नहाटा यांच्या हस्ते झाले. या वेळी पीव्हीपीसीओएचे अध्यक्ष ॲड. अभय छाजेड, संस्थेचे उपाध्यक्ष इंद्रकुमार छाजेड, पीव्हीपीसीओएचे संचालक आर्किटेक्ट प्रसन्ना देसाई आणि जितेंद्र पितालिया आदी उपस्थित होते. मुलांच्या गटाच्या फुटबॉल स्पर्धेत अभयसिन्हा पाटीलच्या दोन गोलच्या जोरावर सीएके संघाने डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २-०ने मात केली. लढतीच्या सहाव्याच मिनिटाला अभय सिन्हाने गोल करून सीएके संघाचे खाते उघडले. यानंतर त्याने ३९व्या मिनिटाला दुसरा गोल करून संघाची आघाडी वाढवली. सीएके संघाने २-० ही आघाडी शेवटपर्यंत कायम राखून बाजी मारली. यानंतर अंशच्या हॅटट्रिकच्या जोरावर ब्रिक्स कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने पीव्हीपीसीओए संघावर ३-०ने मात केली. अंशने दुस-या, १९व्या आणि २८व्या मिनिटाला गोल केला. मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २-०ने विजय मिळवला. मराठवाडा संघाकडून मोहित सप्रे (१९ मी.) आणि यश (३८ मि.) यांनी गोल केले.

यानंतर मुलींच्या गटात सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघ यांच्यातील लढत १-१ अशी बरोबरीत सुटली. सिंहगड कॉलेजकडून श्रुती सूर्यवंशी (१ मि.), तर मराठवाडा कॉलेजकडून आंचल पोरेने (५ मि.) गोल केला. पूर्वा छक्करच्या दोन गोलच्या जोरावर श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २-० ने मात केली. पूर्वाने पाचव्या आणि नवव्या मिनिटाला गोल केले. सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि ब्रिक्स कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांच्यातील लढत गोलशून्य बरोबरीत सुटली. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि पीव्हीपीसीओए यांच्यातील लढत १-१ अशी बरोबरीत सुटली. नानावटी कॉलेजकडून रुजूल आलम (१२ मि.) आणि पीव्हीपीसीओएकडून विशाखा (५ मि.) यांनी गोल केले.

व्हॉलिबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने भारती विद्यापीठ डिमड् युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २१-१४, २१-१८ अशी मात केली. नवले कॉलेजकडून वेदांतिका गाढवेने (१० गुण) विजयात मोलाचा वाटा उचलला. यानंतर अदिती रानावडेच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २१-१७, २२-२० अशी मात केली. मुलांच्या गटात पृथ्वीराज बेनिवालच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर पीव्हीपीसीओए संघाने एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर २१-१५, २१-१७ अशी मात केली.



## पुणे कँटोन्मेंटच्या प्रश्नांसाठी केंद्रीय संरक्षण मंत्र्यांकडे पाठपुरावा

पुणे (दै. संध्या) :

पुणे कँटोन्मेंट बोर्डातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकारातून केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. या शिष्टमंडळात माजी नगरसेवक दिलीप गिरमकर, भारतीय जनता पार्टी पुणे कँटोन्मेंटचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनायक काटकर, उपाध्यक्ष शशी पूरम, चिटणीस विशाल ओव्हाळ यांचा समावेश होता. पुणे कँटोन्मेंटमधील नागरिकांच्या प्रश्नांबाबत केंद्र सरकार सकारात्मक भूमिका घेईल, असा विश्वास केंद्रीय मंत्र्यांनी दिला. या बैठकीत कँटोन्मेंट क्षेत्रातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. विशेषतः वाढीव चटई क्षेत्र (एफएसआय) किमान २.५ पर्यंत वाढवण्याची मागणी करण्यात आली.

यामुळे नागरिकांना बांधकामासाठी मोठा दिलासा मिळणार असल्याचे प्रतिनिधींनी स्पष्ट केले. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ कँटोन्मेंटमधील नागरिकांना मिळावा, यासाठीही पाठपुरावा करण्यात आला. 'प्रधानमंत्री आवास योजना' व शहरी गरीबांसाठीच्या योजनांचा प्रभावी अंमलबजावणीचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला.

## विवो T5x 5G लाँच; मोठी 7200mAh बॅटरी, दमदार प्रोसेसरसह सेगमेंटमध्ये नवा मानक

6GB + 128GB : ₹18,999 | 8GB + 128GB : ₹20,999 | 8GB + 256GB : ₹22,999

पुणे (दै. संध्या) :

विवो इंडियाने आपल्या टी-सीरिजमधील नवीन स्मार्टफोन T5x 5G भारतात लाँच केला असून, मोठी बॅटरी आणि उच्च कार्यक्षमतेमुळे हा फोन विशेष चर्चेत आला आहे. या स्मार्टफोनची सुरुवातीची किंमत ₹18,999 ठेवण्यात आली आहे.

परफॉर्मन्सला प्राधान्य देणाऱ्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेल्या या स्मार्टफोनमध्ये 7200 mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. ही बॅटरी दीर्घकाळ टिकणारी असून रिव्हर्स चार्जिंग सुविधेमुळे फोन पॉवर बँकसारखा वापरता येतो. तसेच 44W फास्ट चार्जिंगमुळे फोन केवळ 43 मिनिटांत 50 टक्क्यांपर्यंत चार्ज होऊ शकतो. कंपनीने या बॅटरीसाठी 6 वर्षांच्या दीर्घकालीन कार्यक्षमतेची हमीही दिली आहे.

परफॉर्मन्सच्या बाबतीत, या फोनमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7400 टर्बो प्रोसेसर देण्यात आला आहे. 4-नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित हा प्रोसेसर जास्त वापरातही सुरळीत कामगिरी देतो. AnTuTu बेंचमार्कवर 1 मिलियनपेक्षा अधिक स्कोअर मिळाल्यामुळे हा फोन आपल्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन ठरतो. यामध्ये 8GB पर्यंत एक्सटेंडेड रॅम आणि UFS 3.1 स्टोरेजमुळे ॲप्स जलद उघडणे, मल्टीटास्किंग आणि डेटा ट्रान्सफर अधिक वेगाने होते.

कॅमेरा विभागात 50 मेगापिक्सलचा AI-पॉवर्ड मुख्य कॅमेरा आणि 32 मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. यामध्ये 4K व्हिडिओ रेकॉर्डिंगची सुविधा असल्यामुळे वापरकर्ते उच्च गुणवत्तेचे फोटो आणि व्हिडिओ सहज टिपू शकतात.




टिकाऊपणाच्या दृष्टीने, या फोनला मिलिटरी-ग्रेड प्रमाणपत्र मिळाले असून IP68 आणि IP69+ वॉटर व डस्ट रेसिस्टन्सची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे कठीण परिस्थितीतही फोन सुरक्षित राहतो.

डिस्प्लेबाबत बोलायचे झाल्यास, यात 6.76 इंचाचा FHD+ डिस्प्ले देण्यात आला आहे, जो रोजच्या वापरासाठी आकर्षक आणि स्पष्ट व्ह्यूइंग अनुभव देतो. हा स्मार्टफोन OriginOS 6 वर चालतो, जो वापरकर्त्यांसाठी सहज आणि स्मार्ट अनुभव देतो.

किंमत आणि उपलब्धता :

Vivo T5x 5G हा सायबर ग्रीन आणि स्टार सिल्व्हर या दोन रंगांमध्ये उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन 24 मार्च 2026 पासून फ्लिपकार्ट, विवो ई-स्टोअर आणि अधिकृत रिटेल स्टोअर्सवर विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

ग्राहकांना HDFC, Axis, SBI कार्ड्स व UPI पेमेंट्सवर ₹2,000 पर्यंत त्वरित सवलत, 6 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट EMI आणि निवडक प्लॅनवर OTT सेवांचा मोफत लाभ मिळणार आहे.

या लॉन्चबाबत बोलताना विवो इंडियाचे वरिष्ठ अधिकारी पंकज गांधी यांनी सांगितले की, T5x 5G हा तरुण ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला असून, दमदार बॅटरी, उत्कृष्ट परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यामुळे हा स्मार्टफोन बाजारात नवे मानक प्रस्थापित करेल.


## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुळा नदीपात्रात महिलेचा मृतदेह आढळला

पिंपरी (दैनिक संध्या) : दापोडी येथील मुळा नदीच्या पात्रात आज (दि.१७) दुपारी सुमारे १२.३० वाजताच्या दरम्यान एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मृतदेह नदीपात्रात असल्याची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जलपरी या विशेष बचाव वाहनाच्या मदतीने जवानांनी नदीपात्रातून मृतदेह बाहेर काढला. सदर महिलेने नदीत उडी कधी आणि कोणत्या कारणामुळे मारली, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास दापोडी पोलीस करत आहेत.

### स्पा सेंटरमध्ये सुरु होता वेश्याव्यवसाय; पोलिसांचा छापा, गुन्हा दाखल




पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी येथील भक्ती-शक्ती चौक परिसरातील व्हिजन प्लस मॉलमध्ये सुरू असलेल्या स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने छापा टाकत स्पा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार (दि.१६) रोजी सायंकाळी सुमारे ७.३३ वाजण्याच्या सुमारास व्हिजन प्लस मॉलमधील ब्लू बिल्स स्पा येथे कारवाई करण्यात आली. आरोपी अमोल खंडू जाधव (वय ४०) याने स्पा सेंटरच्या नावाखाली दोन महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतल्याचे तपासात समोर आले आहे. या अनैतिक व्यवसायातून मिळणाऱ्या पैशावर तो स्वतःची उपजीविका करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी देहूरोड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १४३ तसेच अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ मधील कलम ३, ४ आणि ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलिस हवालदार भगवंता चिंधू मुठे यांच्या पथकाने केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शेख करत आहेत.

### भगतसिंग यांचे पुतणे किरणजीत सिंग यांचे शुक्रवारी पिंपरीत व्याख्यान




पिंपरी (दैनिक संध्या) : वीर शहीद हुतात्मा भगतसिंग यांचे पुतणे किरणजीत सिंग यांचे शुक्रवारी (दि.२० मार्च) सकाळी १० वाजता, पिंपरी कॅम्प येथील आर्य समाज भवन पिंपरी येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती पिंपरी आर्य समाजचे अध्यक्ष सुरेंद्र करमचंदानी यांनी प्रसिद्धीस दिली आहे. "शहीद भगतसिंग आणि आर्य समाज" या विषयावर किरणजीत सिंग हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी डॉ. नयन कुमार आचार्य हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी किरणजीत सिंग आर्यसमाज पिंपरी येथे होम हवन विधी मध्ये सहभाग घेणार आहेत अशी माहिती पिंपरी आर्य समाजचे मंत्री हरेश तिलोकचंदानी, सचिव संजय वासवानी यांनी दिली आहे. किरणजीत सिंग हे पिंपरी चिंचवड शहरात पहिल्यांदाच येत आहेत. या व्याख्यानास आर्य समाज प्रतिनिधी व देश प्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.






### साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार मालमत्ता कर

**पिंपरी (दै. संध्या) :**

- सणाच्या दिवशीही कर भरण्याची सुविधा
- गुढीपाडवा व रामनवमीला मालमत्ता कर भरण्यासाठी कार्यालय राहणार खुले

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू असून नागरिकांना अधिक सोयीस्कर पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता अवघे १५ दिवस शिल्लक राहिले असून या पार्श्वभूमीवर कर वसुलीला गती देण्यात येत आहे. नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची सोय उपलब्ध होणार आहे. या महिन्यात दि.१९ मार्च रोजी गुढीपाडवा तसेच दि.२६ मार्च रोजी श्री राम नवमी या सार्वजनिक सुट्ट्या असून त्या दिवशीही सर्व विभागीय कर संकलन कार्यालये नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहेत. या कालावधीत सर्व कार्यालयांतील कॅश काऊंटर सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ या वेळेत सुरू राहणार आहेत. यामुळे कामकाजाच्या दिवशी वेळ काढणे शक्य नसलेल्या नागरिकांनाही सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी १८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून या कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीनेही मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी कार्यालयात येऊन किंवा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन माध्यमातून सहजपणे कर भरू शकतात.

---

**जल समृद्धी प्रकल्पांतर्गत खेड परीसरातील विरहाम**

## गारगोटवाडी आणि कंदवाडी येथे सिमेंट बंधाऱ्यांचे लोकार्पण

**पिंपरी (दै. संध्या) :**



पुणे जिल्हातील खेड तालूक्यातील येथील विरहाम, गारगोटवाडी आणि कंदवाडी या गावांतील ग्रामस्थांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे ही समस्या अधिक तीव्र होत होती. या भागात चांगला पाऊस पडूनही पाणी साठवणुकीची योग्य सुविधा नसल्याने पाणी वाहून जात होते आणि उन्हाळ्यात टंचाई निर्माण होत होती.

ही समस्या लक्षात घेऊन जल समृद्धी प्रकल्पांतर्गत महिंद्रा अँड महिंद्रा लि. (इंजिन प्लांट, चाकण) आणि यश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विरहाम येथे ६० फूट, गारगोटवाडी येथे १०० फूट आणि कंदवाडी येथे ६० फूट लांबीचे असे तीन सिमेंट बंधारे नदी व ओढा पात्रात बांधण्यात आले आहेत.

या बंधाऱ्यांमुळे अंदाजे ३.१२ कोटी लिटर पाणी साठवण क्षमता निर्माण झाली असून सुमारे १५५.७६ लाख लिटर भूजल पुनर्भरण होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाचा लाभ सुमारे ३,४५० ग्रामस्थांना होणार असून ८५ हेक्टर शेती सिंचनाखाली येईल. तसेच ९५ शेतकऱ्यांना दुसरे पीक घेणे शक्य होईल आणि त्यांच्या उत्पन्नात सुमारे २० टक्के वाढ अपेक्षित आहे. या बंधाऱ्यांमुळे शेती, पिण्याचे पाणी तसेच पाळीव जनावरांसाठीही मोठा लाभ होणार आहे.

या सिमेंट बंधाऱ्यांचा लोकार्पण सोहळा खेड तालूक्यातील विरहाम, गारगोटवाडी आणि कंदवाडी येथे पार पडला. यावेळी संजय क्षीरसागर (प्लांट हेड – महिंद्रा अँड महिंद्रा लि., चाकण), डॉ. चंचल मेडतीया, सौ. स्मिता पिल्ले व इतर महिंद्रा अधिकारी, तसेच श्री. रवींद्र पाटील (अध्यक्ष – यश फाऊंडेशन), ग्रामपंचायत प्रतिनिधी, सरपंच, ग्रामस्थ व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संजय क्षीरसागर म्हणाले की, "महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी सामाजिक बांधिलकी अंतर्गत ग्रामीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत असते. जल समृद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून उभारण्यात आलेले हे सिमेंट बंधारे गावातील जलव्यवस्थापनासाठी आदर्श ठरतील. यामुळे गावातील पाणी समस्या कमी होण्यास मदत होईल आणि शेतकरी, ग्रामस्थ तसेच पशुधन यांना निश्चितच लाभ मिळेल."

या प्रकल्पाच्या कामात ग्रामस्थांनी श्रमदान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भविष्यात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने व काटकसरीने करून जलसंपदा टिकवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले. ग्रामस्थांनी या प्रकल्पाचे स्वागत करत, "या बंधाऱ्यांमुळे भूजल पातळीत सुधारणा होऊन विहिरी व बोअरवेलमध्ये वर्षभर पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे शेतीला मोठा आधार मिळून गावाच्या अर्थकारणाला चालना मिळेल," अशी अपेक्षा ग्रामस्थानी व्यक्त केली. असे यश फाऊंडेशनचे अध्यक्ष रविंद्र पाटील यानी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

---

### निवड चाचणीत राजा शिवछत्रपती कुस्ती संकुलच्या पैलवानांचे यश



**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाच्या वतीने महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धा पिंपरी येथे आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणीचे आयोजन विद्यमान नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या स्पर्धेत अनुपदादा मोरे स्पोर्ट्स फाऊंडेशन संचलित राजा शिवछत्रपती कुस्ती संकुल येथील पैलवानांनी उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्ण व चार रौप्य पदके पटकावली. सुवर्णपदक विजेते खेळाडू वाघोली येथे होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहराचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ही सर्व खेळाडू राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू राजेश काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत असून त्यांच्या प्रशिक्षणामुळे खेळाडूंना हे यश मिळाल्याचे सांगितले जात आहे. तसेच या यशाबद्दल खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### 'प्रशासकीय दृष्टीकोन मार्गदर्शन शिबिर' उत्साहात संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**



शिक्षणव्यवस्था आणि प्रशासकीय क्षेत्रातील वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, पोलीस व प्रशासकीय सेवांमध्ये संवेदनशील अधिकारी घडवण्यासाठी आयोजित केलेले एक दिवसीय 'प्रशासकीय दृष्टीकोन मार्गदर्शन शिबिर' १५ मार्च रोजी येवला येथे उत्साहात पार पडले.

कॉम्रेड रणजीत परदेशी आणि कॉम्रेड सरोजिनी कांबळे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ, चेतना अकादमी व मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद को-ऑर्डिनेशन (लोकशाहीवादी) कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन 'क्रांतीज्योती निवास', पाबळे वस्ती येथे करण्यात आले होते.

शिबिराच्या मुख्य सत्रात मान्यवर सामाजिक कार्यकर्त्यांनी 'पोलीस व प्रशासनाचा मानवी चेहरा' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. जेव्हा एखादा संवेदनशील आणि जागरूक तरुण प्रशासकीय व्यवस्थेत येतो, तेव्हा समाज त्याच्याकडे परिवर्तनाची मोठी आस लावून पाहतो. म्हणूनच केवळ पदासाठी नव्हे, तर लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी युवकांनी प्रशासनात येणे गरजेचे आहे, असा आशय मांडणीचा राहीला.

रायगड येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि विद्यार्थी समुपदेशक स्नेहा कर्णिक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सध्याच्या स्पर्धा परीक्षेतील आव्हाने, आरक्षणाचे प्रश्न आणि सामाजिक सर्वहारांच्या मुलांपुढील संघर्षावर प्रकाश टाकला. ही स्पर्धा केवळ करिअरची नसून ती स्वाभिमानाची असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. शिबिरात नाशिक,पुणे, धुळे जिल्ह्यासह विविध भागांतील विविध कार्यकर्ते, शेतकरी कुटुंबातील तरूण आणि संघर्षरत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सध्याच्या काळात सरकारी नोकरभरतीचे प्रश्न हेतुतः चिघळवले जात असताना, ग्रामीण भागातील तरुण मागे पडू नयेत आणि त्यांनी आत्मविश्वासाने या स्पर्धेत उतरावे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे चेतना अकादमी व आयोजक कमिटीच्या वतीने सांगण्यात आले.शिबिराची सांगता विद्यार्थी आणि मार्गदर्शकांच्या प्रश्नोत्तर सत्राने झाली. या कार्यक्रमास डॉ. रमेश पाटील, डॉ. सायली जगताप, प्रा. मोहन जंगले, ॲड. विजय निकम, प्रा. मढवई, प्रा. निर्मळ, संतोष अहीरे, विकास गवई तसेच अभ्यासक, संवेदनशील प्रशासक आणि परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## स्वतंत्र अत्याधुनिक स्वच्छतागृह उभारणार : राणीमाई पठारे

**पिंपरी (दै. संध्या) :**



ज्या महिला बचत गटाला पाच वर्ष पूर्ण झाले आहेत अशा जवळपास ५० गटांचा सत्कार करण्यात आला.महिलांच्या मनोरंजनासाठी खेळ रंगला पैठणीचा होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाराशे पेक्षा जास्त महिलांनी याचा मनमुराद आनंद लुटला.

महिला दिनाचे औचित्य साधत शहरातील बसस्थानके, बाजारपेठा, मंडई, मार्केट तसेच गर्दीच्या ठिकाणी महिला आणि दिव्यांगांसाठी सर्व सुविधायुक्त आधुनिक स्वच्छतागृहे उभारण्यात येणार असल्याची घोषणा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणीमाई पठारे यांनी केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातर्फे रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे (दि.१६) महिला दिन आयोजित केला होता यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी माजी आमदार अश्विनीताई जगताप, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, माजी नगरसेविका श्रद्धा ताई रवि लांडगे, प्रियाताई अण्णा बनसोडे, उपायुक्त ममता शिंदे सहीत सर्व महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या उपस्थित होत्या. यावेळी बोलताना राणीमाई पठारे म्हणाल्या की,पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असून राज्यातील नामांकित महानगरपालिका म्हणून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नावलौकिक मिळविल्याचा अभिमान वाटतो.शहरातील बसस्थानके, बाजारपेठा, मंडई, मार्केट तसेच गर्दीच्या ठिकाणी महिला आणि दिव्यांगांसाठी सर्व सुविधायुक्त आधुनिक स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहेत. शहरातील महिलांना स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्यामुळे होणारी गैरसोय आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे महिलांसाठी स्वतंत्र आधुनिक स्वच्छतागृहे उभारणारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका राज्यातील पहिली महानगरपालिका ठरेल. शिक्षण, नोकरी किंवा प्रशिक्षणासाठी शहरात बाहेरून येणाऱ्या महिलांसाठी अल्पदरात 'वन स्टॉप शेल्टर होम' म्हणजेच सुरक्षित वस्तीगृह उभारण्यात येणार आहे. त्यामुळे शहरात येणाऱ्या महिलांना सुरक्षित निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष मोबाईल ॲप तयार करण्यात येणार आहे. संकटात सापडलेल्या कोणत्याही महिलेला या ॲपच्या माध्यमातून पोलीस, महानगरपालिका तसेच सामाजिक संस्थांशी थेट संपर्क साधून मदत मागता येणार आहे. या ॲपला पोलीस व पालिका यंत्रणेची जोड देण्यात येणार असून यासाठी महिला सुरक्षा व सहाय्यता समिती स्थापन करण्यात येणार आहे.तसेच शहरातील महिलांनी महिलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम सुचविल्यास त्यांचेही स्वागत करून त्याची अंमलबजावणी केली जाईल असे मत सभापती राणीमाई पठारे यांनी व्यक्त केले.

### गॅस सिलेंडरचे वितरण फक्त ओटीपीद्वारेच होणार

**९६ तासांत होणार घरपोच – जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी**

**पिंपरी (दै. संध्या) :**

घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण केवळ OTP प्रणालीद्वारेच करण्यात येणार असून गॅस बुकिंग केल्यानंतर ९६ तासांच्या आत सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक राहील, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील सर्व तेल कंपन्या व गॅस एजन्सींच्या प्रतिनिधींना घरगुती गॅस सिलेंडर वितरणाबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा केवळ OTP प्रणालीद्वारेच करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच गोदाम, गॅस एजन्सी किंवा इतर कोणत्याही ठिकाणाहून थेट गॅस सिलेंडरचे वितरण पूर्णपणे बंद ठेवण्याच्या सूचना तेल कंपन्या व वितरकांना देण्यात आल्या. त्याअनुषंगाने सर्व गॅस एजन्सींनी त्यांच्या गोदाम किंवा कार्यालयाबाहेर "गॅस सिलेंडरचे वितरण फक्त OTP द्वारेच ९६ तासांच्या आत घरपोहोच करण्यात येईल" असा आशय दर्शविणारे फलक लावावेत, असे निर्देशही देण्यात आले. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींनी त्यांच्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर "गॅस सिलेंडरचे वितरण फक्त OTP द्वारेच ९६ तासांच्या आत घरपोहोच करण्यात येईल, तरी गॅस एजन्सीसमोर गर्दी करू नये" असा संदेश (SMS) पाठवावा, असेही सांगण्यात आले. याशिवाय, ग्राहकांनी घरगुती गॅस सिलेंडरचे बुकिंग केल्यानंतर ९६ तासांच्या आत घरपोहोच वितरण करणे बंधनकारक राहील, असे निर्देश गॅस वितरकांना देण्यात आले आहेत. नियमानुसार सुरू असलेल्या गॅस सिलेंडर वितरण प्रक्रियेत कोणीही अडथळा निर्माण केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश पोलिस प्रशासनालाही देण्यात आले आहेत.

---

## बुद्ध तत्त्वज्ञान आणि मूल्यांचा उद्योग, व्यवस्थापनात उपयोग करा - डॉ. प्रशांत पानसरे

**एसबीपीआयएम येथे इन्स्पायर २०२६ आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न**

**पिंपरी (दै. संध्या) :**




गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान, संतुलित विचार आणि जबाबदार कृती या मूल्यांचा उद्योग आणि व्यवस्थापन क्षेत्रासाठी उपयोग केल्यास उत्तम व्यवसाय स्थापित करता येऊ शकतो. जग जागतिक परिवर्तनाच्या टप्प्यातून जात असून भूराजकीय पुनर्रचना घडत आहेत. जसे की चीनने पुरवठा साखळी व्यवस्थापनात मोठी प्रगती केली असली तरी भारतासारख्या विकसनशील देशांसाठी उत्पादन क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत असे प्रतिपादन उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) येथे "इन्स्पायर २०२६ शाश्वत पद्धती, नवोपक्रम आणि जबाबदार उद्योजकता" या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी बातांगा विद्यापीठ फिलिपाईन्स डॉ. पॅस्टर आर्गुएल्स, एसआयआयटी थम्मसात विद्यापीठ थायलंड डॉ. थनवडी चिंडा, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा-अव्हीला, राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, एसबीपीआयएम संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे आदी उपस्थित होते. डॉ. प्रशांत पानसरे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य हे देशातील डेटा सेंटर कॅपिटल म्हणून वेगाने विकसित होत आहे, ज्यामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे. वाढती लोकसंख्या, गरिब रेषेखालील लोकांचे वाढते उत्पन्न आणि तरुणांची वाढती संख्या यामुळे भारत जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा घटक बनत आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात चिप डिझाईन, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास यामध्ये भारताने पुढाकार घ्यावा, तर उत्पादन प्रक्रियेतील काही भाग जागतिक स्तरावर आउट सोर्सिंगद्वारे विकसित होऊ शकतो. तसेच डिजिटल इनोव्हेशन, डेटा ॲनालिटिक्स आणि डिमांड फोरकास्टिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उद्योगक्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत असे उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे म्हणाले.

या परिषदेसाठी एकूण ५३८ सहभागींनी नोंदणी केली आणि २४० संशोधनपर लेख सादर केले. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई या देशांतील संशोधकांचा यात समावेश होता. या परिषदेस वॉर्सेस्टर युनिव्हर्सिटी ऑफ युनायटेड किंग्डम, वॉर्सेस्टर बिझनेस स्कूल यांचे सहकार्य मिळाले होते. जर्नल प्रेस ऑफ इंडिया ही संस्था प्रकाशन भागीदार होती. यावेळी तीन जागतिक विद्यापीठांसोबत संशोधन करार करण्यात आला.

या परिषदेत पॅनालिस्ट राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा-अव्हीला, सायबर इलेक्ट्रॉनिक वारफेअर आर्मी वॉर कॉलेज प्रा. डॉ. वीरेंद्र मिश्रा, स्किलव्हेर्ज सीईओ जय ढोलकिया, सेल्स मार्केटिंग प्रमुख थंबूराज अंथुवन, एसबीपीआयएम समन्वयक प्रा. भूषण परदेशी यांनी सहभागीं सोबत व्यवस्थापन, शाश्वत विकास, जबाबदार व्यवसाय नवोन्मेष आणि डिजिटल परिवर्तन यांसारख्या विषयांवर चर्चा केली.

डॉ. दिलीप पवार, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. संतोष शिंदे यांनी नियोजन केले.

सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन आणि डॉ. योगेंद्र देवकर यांनी आभार मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.



## ४५ दिवसांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

### नीरा ग्रामपंचायत गाळे वाटप प्रकरण

नीरा (दै. संध्या)

नीरा ग्रामपंचायतीच्या व्यापारी गाळे वाटप प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश देत पारदर्शक पद्धतीने ४५ दिवसांच्या आत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. अन्वर सादिक शेख यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती अभय जे. मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी असा आरोप केला होता की, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ३० डिसेंबर २०२४ रोजी अंतरिम आदेश दिल्यानंतरही गाळे वाटपाची प्रक्रिया पुढे सरकलेली नाही. ग्रामपंचायतीने बांधलेल्या व्यापारी गाळ्यांच्या वाटपासाठी कायद्यानुसार प्रक्रिया सुरू असली, तरी प्रत्यक्षात कोणतीही प्रगती झालेली नसल्याने न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, संबंधित प्रक्रिया कायद्यानुसार आणि पारदर्शक पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक २ यांना सर्व नियमांचे पालन करत आजपासून ४५ दिवसांच्या आत गाळे वाटपाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अंतिम निर्णयामुळे कोणत्याही व्यक्तीला अन्याय झाल्यास, त्यांना कायदेशीर मार्गाने दाद मागण्याचा अधिकार राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या निर्देशांसह संबंधित रिट याचिका निकाली काढण्यात आली आहे. या निर्णयामुळे नीरा परिसरातील व्यापारी गाळे वाटप प्रक्रियेला गती मिळणार असून, पारदर्शकता राखली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ओतूर येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला

नारायणगाव (दैनिक संध्या) : ओतूर येथील श्री संत गाडगे महाराज विद्यालयातील दहावीच्या परीक्षा केंद्रात चैतन्य विद्यालयातील 16 वर्षीय विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सोमवारी गेला होता. त्यावेळी त्या परीक्षा केंद्रावर एक 17 वर्षीय अनोळखी अल्पवयीन मुलगा परीक्षा देण्यासाठी आलेल्या मुलाच्या वर्गात घुसला. व त्याने आपल्या दप्तरातून कोयता काढून त्या विद्यार्थ्यावर  हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या विद्यार्थ्याने प्रसंगावधान राखत  हातावर वार झेलत स्वतःचा बचाव केला.त्यामुळे त्याचा जीव वाचला असून त्याच्या हाताला दुखापत झाली आहे अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परीक्षा केंद्रात खळबळ उडाली असून काही दिवसांपूर्वी झालेल्या वादातून हा हल्ला झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर ओतूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत अल्पवयीन मुख्य आरोपीसह आणखी चार विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.पोलिसांच्या तत्परतेमुळे पुढील संभाव्य गंभीर प्रकार टाळल्याचे सांगितले जात आहे.पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक लहू थाटे हे करीत आहेत.

### पीडीसीसी बँकेच्या क्लार्क भरतीचा निकाल लवकरच जाहीर

बारामती (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून (पीडीसीसी बँक) क्लार्क पदाच्या 356 जागांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल लवकरच घोषित होणार आहे. त्यादृष्टीने बँकेकडून महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) या परीक्षा घेणाऱ्या एजन्सीला पत्रान्वये कळविण्यात आल्याची माहिती बँकेकडून मिळाली. त्यामुळे परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची बऱ्याच दिवसांची प्रतीक्षा संपणार आहे. बँकेच्या कार्यरत असलेल्या सर्व शाखांमध्ये रिक्त पदांमुळे कामकाजात अधिक गतिमानता आणण्यासाठी परीक्षेद्वारे क्लार्क पदाच्या जागा भरण्याचा निर्णय तत्कालीन संचालक मंडळाने घेतला होता. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सुमारे 356 पदांसाठी लेखी परीक्षा झालेली आहे. बँकेच्या दीर्घकाळ लांबलेल्या या परीक्षेच्या निकालाकडे उमेदवारांचे लक्ष लागलेले आहे. आता मात्र हा निकाल एमकेसीएल एजन्सीकडून लवकरच घोषित होणार असल्याचे सांगण्यात आले. राज्यात पीडीसीसी बँक ही वार्षिक सुमारे 27 हजार कोटी रुपयांचा व्यवसाय करणारी एक अग्रगण्य बँक आहे. पुणे जिल्ह्यात बँकेच्या 294 शाखा कार्यरत आहेत. शेतकऱ्यांसह ग्राहकांसाठी बँकेकडून विविध कर्ज योजना राबविल्या जातात. त्यामध्ये पीक कर्जासह साखर कारखान्यांना देण्यात येणारे कर्ज, शैक्षणिक, व्यावसायिक कॅश क्रेडिट, ग्राहकोपयोगी वस्तू, औद्योगिक, वाहन, सोने तारण, गृहकर्ज आदींचा समावेश आहे. रिक्त जागांच्या पदभरतीनंतर बँकेच्या दैनंदिन कामाचा वेग वाढून योजना अंमलबजावणीलाही गती मिळणे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले.

### भीमाशंकर मंदिरात व्हीआयपी दर्शन प्रकरण; चौकशीचे आदेश

भीमाशंकर (दैनिक संध्या) : श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील महादेव मंदिर दर्शनासाठी बंद असतानाही खासदार निशिकांत दुबे यांना मंदिरात दर्शन देण्याचा निर्णय कोणी घेतला? तसेच त्यांना व्हीआयपी सुविधा कोणी उपलब्ध करून दिल्या? याची चौकशी करण्यात येईल आणि यासंदर्भात लवकरच खुलासा करण्यात येईल, अशी माहिती उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली. शिवसेनेचे आमदार सचिन अहिर यांनी 'पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे हा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील मंदिर मागील दोन ते तीन महिन्यांपासून भाविकांसाठी बंद आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर काही काळासाठी मंदिर खुले करण्याबाबत चर्चा झाली होती; मात्र संभाव्य गर्दी लक्षात घेता तो निर्णयही रद्द करण्यात आला. या पार्श्वभूमीवर स्थानिक आमदार उपस्थित असतानाही पुण्याचे जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय पूजा केली. असे असतानाच महाराष्ट्राविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारे खासदार निशिकांत दुबे यांना व्हीआयपी सुविधा देत मंदिरात दर्शनाची परवानगी देण्यात आली. त्यांच्या हेलिकॉप्टरला उतरण्याची परवानगी कोणी दिली. त्यांच्यासाठी वाहनांची व्यवस्था कोणी केली आणि एका खासदाराला इतकी विशेष वागणूक कोणी दिली, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी अहिर यांनी केली. यावर उत्तर देताना उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले की, मराठी माणसाविरोधात वक्तव्य करणाऱ्यांविरोधात शिवसेनेची भूमिका नेहमीच ठाम राहिली आहे आणि अशा वक्तव्यांचा आम्ही निषेध केला आहे. भीमाशंकर मंदिर बंद असताना खासदार दुबे यांना व्हीआयपी सुविधा देऊन दर्शन घडविण्याचा निर्णय नेमका कोणी घेतला? याची चौकशी करून याबाबतचा सविस्तर खुलासा केला जाईल.

# पुण्यात "कष्टकरी राजा फार्मर्स मार्केट" उपक्रम

### ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना थेट बाजारपेठ

नाझरे सुपे (दै. संध्या)

ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या कृषी व घरगुती उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद पुणे (उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि कष्टकरी राजा ॲग्रो उत्पादक कंपनी लिमिटेड यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या कराराअंतर्गत "कष्टकरी राजा फार्मर्स मार्केट" या नावाने पुणे शहरात नियमित आठवडी बाजार आयोजित करण्यात येणार असून, ग्रामीण महिला बचत गटांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची मोठी संधी मिळणार आहे. या उपक्रमाद्वारे महिलांच्या उत्पादनांचे मार्केटिंग, ब्रँडिंग आणि विक्री व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे केले जाणार आहे.

या उपक्रमास जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांचे मार्गदर्शन लाभले असून, उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांनी या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला आहे. तसेच कष्टकरी राजा ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेडच्या संचालक पूजा गरुड व मुख्य कार्यकारी अधिकारी नवनाथ गरुड यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान  अंतर्गत महिला बचत गटांना या उपक्रमात सहभागी करून घेणे, त्यांना



आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे तसेच शासकीय योजनांच्या माध्यमातून त्यांना बळकटी देण्याची जबाबदारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पार पाडणार आहे.

कष्टकरी राजा ॲग्रो उत्पादक कंपनी लिमिटेड ही संस्था "कष्टकरी राजा फार्मर्स मार्केट" चे नियोजन व व्यवस्थापन करणार असून, महिला उत्पादकांना विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, घाऊक व किरकोळ विक्री व्यवस्था उभारणे, तसेच उत्पादनांचे जाहिरात, मार्केटिंग, ब्रँडिंग आणि सप्लाय मॅनेजमेंट याची जबाबदारी सांभाळणार आहे. याशिवाय महिलांना पॅकेजिंग, ब्रँडिंग व विक्री कौशल्यांबाबत मार्गदर्शन दिले जाणार आहे.

सदर कंपनी गेल्या ५ ते ६ वर्षांपासून शेतकरी व महिला बचत गटांसाठी रिटेल व घाऊक बाजारपेठ निर्माण करत असून, या अनुभवाचा लाभ या उपक्रमाला होणार आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण महिला उत्पादकांना सातत्यपूर्ण बाजारपेठ उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकरी व ग्राहक यांच्यात थेट संपर्क वाढून स्थानिक व दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन मिळणार आहे.

या कराराअंतर्गत ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळणार असून, शहरी ग्राहकांना शेतमालासोबत घरगुती मसाले, पापड, लोणची व विविध पारंपरिक पदार्थ एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

"ग्रामीण महिला बचत गटांना बाजारपेठेशी जोडणे ही काळाची गरज आहे. या उपक्रमामुळे महिलांना त्यांच्या उत्पादनांना योग्य दर मिळेल आणि त्यांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक मजबूत होईल," असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी व्यक्त केले

## खालुंब्रे येथे बुधवारपासून श्री जोपादेवी यात्रा उत्सव

### बैलगाडा शर्यतींसह रंगणार कुस्त्यांचा जंगी आखाडा

चाकण (दै. संध्या)

उद्योग नगरीचे नाक असलेल्या चाकण औद्योगिक वसाहतीतील खालुंब्रे (ता. खेड) येथे बुधवार (दि.१८) ते गुरुवार (दि.१९ मार्च) या सलग दोन दिवसांच्या कालावधीत श्री जोपादेवी यात्रा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही खालुंब्रे येथे श्री जोपादेवी यात्रेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी बुधवारी देवदेवतांचा अभिषेक, पूजा, विधीवत धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर दुपारी बैलगाड्यांचा थरार सुरू होणार आहे. विजेत्या बैलगाडा मालकांना रोख रकमेपासून ट्रॅक्टर, बुलेट गाडी, कुटी मशीन गौरवचिन्ह बहाल करून सन्मानित करण्यात येणार आहे. पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश कांताराम बोत्रे यांच्यातर्फे बैलगाडा शर्यतीतील प्रथम क्रमांकास रोख ७१ हजार रुपये, तर प्रथम क्रमांकाच्या फळीफोड गाड्यास उद्योजक मारुती बोत्रे यांच्यातर्फे ७ हजार रुपये देण्यात येणार आहेत.  श्री जोपादेवी यात्रेनिमित्त गुरुवारी (दि.१९ मार्च) सायंकाळी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा आयोजित करण्यात आला आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या पहिलवानास जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे व खेड पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल पवार यांच्या वतीने रोख इनाम देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास माजी उपसरपंच दिलीप रामदास बोत्रे व खालंब्रे सोसायटीचे संचालक राजाभाऊ बोत्रे यांच्यातर्फे पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच स्व. राजाराम गीताराम बोत्रे यांच्या स्मरणार्थ खालुंब्रे गावचे माजी उपसरपंच मनोज बोत्रे यांच्यातर्फे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

## आपत्ती व्यवस्थापनाचे ज्ञान नागरिकांसाठी महत्वाचे - परदेशी

वाल्हे (दै. संध्या)



आयुष्य फार सुंदर आहे, पण आपल्या आयुष्यात एका चुकीमुळे मोठी आपत्ती ओढवू शकते. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाचे ज्ञान प्रत्येक नागरिकासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन योगेश परदेशी यांनी केले. वाल्हे (ता. पुरंदर) येथील ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आपत्तीच्या काळात नागरिकांनी स्वतःचे रक्षण कसे करावे आणि इतरांना मदत कशी करावी याचे प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक केशव जगताप, सरपंच अतुल गायकवाड, उपसरपंच सागर भुजबळ, सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार, ग्रामविकास अधिकारी अनिल हिरासकर, पोलिस पाटील राहुल शिंदे श्रीतेज जगताप तसेच सुजाता बरकडे, रूपाली सोनवणे नितीनकुमार पवार, मोहन दुर्गाडे, भारत वाघोले, जयवंत भुजबळ यांच्यासह परिसरातील, आशा स्वयंसेविका आणि महर्षी वाल्मिकी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परदेशी यांनी आपत्ती म्हणजे काय, नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीतील फरक याबाबत सविस्तर माहिती दिली. पूर, भूकंप, वादळ, आग, अपघात यांसारख्या आपत्तींना तोंड देताना घ्यावयाच्या खबरदारीवर त्यांनी विशेष भर दिला. आपत्ती आल्यावरच उपाययोजना करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी आधीच सज्ज राहणे अधिक गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. घरगुती गॅस सिलेंडर गळती, विजेचे शॉर्टसर्किट, तसेच गावातील मोठ्या आगीच्या घटनांमध्ये त्वरित प्रतिसाद कसा द्यावा, प्राथमिक उपचार कसे करावेत, जखमींना सुरक्षितपणे हलविण्याच्या पद्धती, तसेच आपत्कालीन क्रमांकांचा योग्य वापर याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच 'गोल्डन अवर'चे महत्त्व सांगत अपघातग्रस्तांना तातडीने मदत केल्यास त्यांचे प्राण वाचू शकतात, असेही त्यांनी नमूद केले. अपघातग्रस्ताला मदत करणाऱ्यावर कोणताही गुन्हा दाखल होत नाही, तसेच उपचार देण्यास नकार देणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई होऊ शकते, ही महत्त्वाची माहितीही त्यांनी दिली. आपत्तीच्या वेळी अफवा पसरवू नयेत, प्रशासनाशी समन्वय ठेवावा आणि स्वतःची व इतरांची सुरक्षितता प्रथम ठेवावी, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच अतुल गायकवाड यांनी  केले,तर उपस्थितांचे आभार मंडल अधिकारी बापुसाहेब देवकर यांनी मानले.

## धनकवडीतील धोकादायक चेंबरकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

### अपघाताची वाट पाहताय का? : सामाजिक कार्यकर्त्या वर्षाताई नाईक यांचा संतप्त सवाल

कवठे येमाई (दै. संध्या)

मागील वर्षभरात सातत्याने सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत ते मार्गी कसे लागेल असा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय युवती उपाध्यक्षा जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती वर्षाताई नाईक यांनी पुण्याच्या धनकवडी परिसरातील पुण्याई नगर २०/१ रुबी बेकरी समोर जवळ रस्त्याच्या कडेलाच असलेला मोठा व धोकादायक चेंबर गेल्या अनेक दिवसांपासून दुरुस्ती अभावी उघड्यावर पडलेला असून नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही



ठोस कार्यवाही होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या संदर्भात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वर्षाताई नाईक यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला थेट सवाल केला आहे की, "हा जीवघेणा प्रकार दिसत असूनही संबंधित यंत्रणा का गप्प बसली आहे ? एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासनास जाग येणार का?" विशेष म्हणजे, हा चेंबर रस्त्याच्या कडेला असल्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात तो नजरेस न पडण्याची शक्यता अधिक असून पादचारी, दुचाकीस्वार व लहान मुलांसाठी तो अत्यंत धोकादायक ठरत आहे. परिसरातील नागरिकांनीही तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.दरम्यान, प्रशासनाने तत्काळ याकडे लक्ष देऊन चेंबरची सुरक्षित दुरुस्ती करावी, अन्यथा याबाबत परिसरातील नागरिकांसह आवाज उठवण्याचा इशारा वर्षाताई नाईक यांनी दिला आहे.

## चाकण येथे २०२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

चाकण (दै. संध्या)

सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिताजी यांच्या आशीर्वादाने चाकण येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन गोरे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश सचिव सचिन वाघमारे यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक धीरज मुटके, प्रेम जगताप आदिंसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते. संत निरंकारी मिशन द्वारा चाकण परिसरामध्ये मानवतेच्या कल्याणार्थ वेळोवेळी अनेक जनसेवेचे उपक्रम आयोजीत करण्यात येतात. त्यामध्ये मुख्यतः स्वच्छता अभियान व वृक्षारोपण यासारख्या सामाजिक उपक्रमाला प्राधान्य देण्यात येते. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी संत निरंकारी सेवादल, मिशनचे अनुयायी आदींचे विशेष योगदान लाभले. दरम्यान, रक्तदान जागृती ही जनसामान्यांमध्ये व्हावी यासाठी चाकण परिसरात घरोघरी जाऊन रक्तदानाचा संदेश पोहोचविण्यात आला होता. त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुखी मधुकर गोसावी यांनी आभार मानले.

## माळशिरस येथील दहावीच्या विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर उत्साहात संपन्न

पुरंदर (दै. संध्या)




सुमारे २७ वर्षांपूर्वी शिक्षण घेतलेल्या आणि सध्या चाळीशीच्या पुढील उंबरठ्यावर असलेल्या पुरंदर तालुक्यातील माळशिरस येथील श्री भुलेश्वर विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह संवाद मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक विश्वास चव्हाण,वर्गशिक्षक अशोक गरड, शिक्षक सुनील जाधव, संजय भुजे, लालासो वाबळे, नंदा इनकाणे, शिपाई तुकाराम जाधव तसेच संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव, माजी अध्यक्ष बाळू तात्या यादव, खजिनदार पोपट यादव, मुख्याध्यापक अर्जुन शेंडगे आणि वरिष्ठ लिपिक सिद्धाराम कांबळे, पत्रकार चंद्रकांत चौंडकर,मंगेश गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या मेळाव्यास माजी विद्यार्थी, शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

दहावीच्या माजी अनेक वर्षांनंतर सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र आल्यामुळे कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वांनी एकमेकांची ओळख करून घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेतील गमती-जमती, शिक्षकांच्या आठवणी आणि जुन्या दिवसांच्या आठवणींवर मनमोकळ्या गप्पा रंगल्या. काही विद्यार्थ्यांनी आपल्या सध्याच्या कामाबद्दल आणि आयुष्यातील अनुभवांबद्दल माहिती दिली.

या गेट-टुगेदरमध्ये विविध खेळ, मनोरंजन कार्यक्रम तसेच सामूहिक जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांनी एकत्र फोटो काढून या क्षणांची आठवण जपली.

संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव यांनी या उपक्रमाचे कौतुक करत जुने दिवस आणि आठवणींना उजाळा दिला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माजी मुख्याध्यापक विश्वास चव्हाण यांनी बदलत्या शिक्षण पद्धती व संस्कारांबद्दल मनोगत व्यक्त करत खंत व्यक्त केली. वर्गशिक्षक अशोक गरड यांनी सिंहगड सहलीदरम्यानचा एक प्रसंग सांगत एका विद्यार्थ्याला स्वतःच्या खांद्यावर बसवून खाली आणल्याची आठवण सांगितली.

शिक्षक सुनील जाधव यांनी भविष्यातील अडचणींना सामोरे जाण्याची तयारी ठेवत आई-वडील तसेच सासू-सासरे यांची काळजी घेण्याचे मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी नितीन यादव यांनी शाळेत केलेल्या दंगा-मस्ती व खोड्यांच्या आठवणी सांगत विद्यार्थ्यांच्या वतीने केलेल्या चुका मान्य करून माफी मागितली. शाळेच्या भिंतीवरील फोडलेल्या फळ्याची आठवणही त्यांनी सांगितली.

आपल्या शिकवणुकीमुळे विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचे पाहून शिक्षकही भावूक झाले. विद्यालयातील माजी शिक्षक नवले सर, माने मॅडम, शितोळे सर, लामखडे सर आणि सूर्यवंशी सर यांच्या निधनाबद्दल विद्यार्थ्यांनी शोक व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. विद्यालयाचे आपण देणे लागतो या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला इलेक्ट्रिकल इन्व्हर्टर संच भेट दिला तसेच माजी शिक्षकांचा सत्कार करून भेटवस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे देखणे आयोजन सुनील महाले, प्रकाश ज्ञानदेव यादव, बाळकृष्ण झिंजुरके आणि सुकेशनी आबले यांनी केले.

थोडक्यात पण महत्वाचे...



## फॅबइंडियाने केली कलेक्शनची घोषणा; विणकाम आणि आधुनिक शैलीचा सुंदर संगम

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्रातील नववर्षाचा उत्साहपूर्ण सण गुढी पाडवा जवळ येत असताना, फॅबइंडियाने आपल्या खास गुढी पाडवा कलेक्शनची घोषणा केली आहे. परंपरेत गुंफलेली समृद्धी आणि उत्साह साजरा करण्यासाठी तयार केलेल्या या कलेक्शनमध्ये पुरुष आणि महिलांसाठी आकर्षक पोशाखांची खास निवड आहे. पारंपरिक विणकाम आणि आधुनिक शैली यांचा सुंदर संगम या संग्रहात दिसून येतो. महिलांसाठीच्या या कलेक्शनमध्ये आकर्षक हँड-ब्लॉक प्रिंट साड्या, सिल्क एम्ब्रॉइडरी कुर्ते, तसेच बनारसी आणि चिकनकारी दुपट्ट्यांची पारंपरिक देखणी झलक पाहायला मिळते. पुरुषांसाठी या संग्रहात विविध प्रकारचे शर्ट, शॉर्ट आणि लॉन्ग कुर्ते, तसेच उत्कृष्ट कारागिरी दर्शवणारे बंधगला जॅकेट्स उपलब्ध आहेत. फॅबइंडियाचे गुढी पाडवा कलेक्शन आता देशभरातील फॅबइंडिया स्टोअर्समध्ये तसेच ऑनलाइन www.fabindia.com वर उपलब्ध आहे.




## इसुझू मोटर्सकडून देशभर 'प्री-समर कॅम्प'; 23 ते 28 मार्चदरम्यान सेवा लाभ

पुणे (दैनिक संध्या) : इसुझू मोटर्स इंडियाने आपल्या ग्राहकांसाठी देशव्यापी 'इसुझू आय-केअर प्री-समर कॅम्प' आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हा विशेष सेवा उपक्रम 23 ते 28 मार्च 2026 दरम्यान देशभरातील सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना उन्हाळ्यापूर्वी वाहनांची योग्य तपासणी करून त्रासमुक्त ड्रायव्हिंग अनुभव देणे हा आहे. इसुझू डी-मॅक्स पिक-अप आणि एसयूव्ही वाहनांसाठी हा कॅम्प उपयुक्त ठरणार आहे. शिबिरादरम्यान ग्राहकांना अनेक आकर्षक सुविधा दिल्या जाणार आहेत. यामध्ये मोफत 37-बिंदू तपासणी, मजुरीवर 10 टक्के सवलत, सुट्ट्या भागांवर व वंगणावर 5 टक्के सवलत, तसेच विस्तारित वॉरंटीवर 20 टक्क्यांपर्यंत सवलतींचा समावेश आहे. याशिवाय रोडसाइड असिस्टन्स आणि इतर सेवांवरही विशेष ऑफर उपलब्ध असतील. हा प्री-समर कॅम्प पुणे, मुंबई, नागपूर, नाशिकसह देशातील अनेक शहरांमध्ये आयोजित करण्यात येणार असून ग्राहकांना आपल्या जवळच्या अधिकृत सेवा केंद्रात जाऊन या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. ग्राहकांनी सेवा बुकिंगसाठी इसुझूच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा जवळच्या डीलरशिपशी संपर्क साधण्याचे आवाहन कंपनीकडून करण्यात आले आहे.

## कॅसाग्रँडने घर खरेदीदारांसाठी नो प्री-ईएमआय योजना सुरु केली



पुणे (दैनिक संध्या) : भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी जवळ असलेल्या आपल्या कॅसाग्रँड कॅलॅडियम या प्रीमियम रेसिडेन्शियल प्रोजेक्टमध्ये 'नो प्री-ईएमआय' योजना सुरू केली आहे. ही योजना मर्यादित कालावधीसाठी असून फक्त नवीन बुकिंगसाठी लागू आहे. ग्राहकांसाठी ही ऑफर 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध राहणार आहे. या योजनेचा उद्देश घर खरेदी प्रक्रिया अधिक सोपी आणि परवडणारी बनवणे हा आहे, ज्यामुळे इच्छुकांना सहजपणे स्वतःचे घर घेता येईल. आजच्या काळात अनेक लोकांना घरभाडे, ईएमआय आणि इतर खर्च एकाच वेळी सांभाळावे लागतात. अशा परिस्थितीत ही योजना घर खरेदी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कॅसाग्रँडचा एक प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत, ठराविक कालावधीपर्यंत कॅसाग्रँड खरेदीदाराच्या वतीने प्री-ईएमआय स्वतः भरते. त्यामुळे घर बांधकाम सुरू असताना ग्राहकांना लगेच मासिक हप्त्यांचा ताण येत नाही आणि ते सहजपणे आपले घर खरेदी करू शकतात. मर्यादित कालावधीसाठी असलेली ही ऑफर घर खरेदी प्रक्रिया सोपी, स्पष्ट आणि सोयीची व्हावी यासाठी तयार करण्यात आली आहे. ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी फक्त प्रॉपर्टी बुक करावी लागेल आणि ठरलेल्या वेळेत होम लोनची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. कॅसाग्रँड कॅलॅडियममध्ये आकर्षक डिझाइन असलेली प्रशस्त 2 आणि 3 बीएचके घरे उपलब्ध आहेत. येथे 110 पेक्षा जास्त आधुनिक सुविधा आहेत, जसे की 1800 चौ.फुट इन्फिनिटी पूल, अँफीथिएटर, योगा कोर्ट आणि मल्टी-पर्पज कोर्ट आणि इतर अनेक सुविधांचा समावेश आहे. या प्रोजेक्टमध्ये सुमारे 70% मोकळी जागा असून त्याची रचना सिंगापूर स्टाइलमध्ये करण्यात आली आहे. हा प्रोजेक्ट पुण्यातील अप्पर खराडी या वेगाने विकसित होणाऱ्या भागात आहे. येथे नामांकित शाळा, कॉलेज, आयटी हब्स आणि इतर आवश्यक सुविधा सहजपणे उपलब्ध आहेत.हा प्रोजेक्ट महाराष्ट्र रेरा – नोंदणी क्र.: P52100080302 अंतर्गत नोंदणीकृत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी साइटला भेट द्या किंवा 8220049082 वर कॉल करा.

## महावैद्यकीय शिबिराचे आयोजन



लोणावळा (दैनिक संध्या) : श्री नारायणी सेवा संस्थान व श्री नारायणी नारी चेतना केंद्र, लोणावळा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता.२२) रोजी लोणावळ्यात महावैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात त्वचारोग, हृदयरोग, स्त्रीरोग, दंतरोग, नाक-कान-घसा, नेत्ररोग, थायरॉईड, मधुमेह, हाडांचे आजार व कर्करोग अशा विविध तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून केल्या जाणार आहेत. तसेच रुग्णांना मोफत औषधेही देण्यात येणार आहेत. शिबिर तुंगार्ली येथील श्री प्रभुदास झुनझुनवाला हेल्थ सेंटर ट्रस्ट, श्री नारायणी धाम येथे होणार आहे. शिबिरासाठी नावनोंदणी शनिवार (२१ मार्च) रोजी सायंकाळपर्यंत सुरू राहणार आहे. शिबिराला येताना रुग्णांनी जुने वैद्यकीय कागदपत्रे सोबत आणावीत, अशी सूचना संस्थानच्या वतीने करण्यात आली आहे. सकाळी ९.३० ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे.

# उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील अंतर कमी होण्याची गरज

### विवेक गाडगीळ यांचे प्रतिपादन; 'अभिनव अभियांत्रिकी स्थापत्य केंद्रा'तर्फे विशेष संवादसत्राचे आयोजन

पुणे (दै. संध्या)




"देशात आगामी काळात अभियांत्रिकीशी संबंधित पायाभूत सुविधा क्षेत्रात प्रचंड संधी आहेत, मात्र कुशल तसेच प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता, ही मोठी समस्या या क्षेत्राला भेडसावत आहे. या समस्येच्या निराकरणासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांतील अंतर कमी होण्याची गरज आहे. अभियांत्रिकी तज्ज्ञ आणि विद्यार्थी, यांच्यात सेतूनिर्मिती तसेच अभियंता न होताही, पायाभूत सुविधा निर्मितीच्या क्षेत्रात प्रशिक्षित युवा मनुष्यबळाची मोठ्या संख्येने निर्मिती, हे ध्येय बाळगणाऱ्या अभिनव अभियांत्रिकी स्थापत्त्य केंद्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे," असे प्रतिपादन एल अँड टी मेट्रोरेलचे माजी मुख्य कार्यकारी तसेच व्यवस्थापकीय संचालक विवेक गाडगीळ यांनी केले.

डेक्कन जिमखाना क्लबमध्ये अभिनव अभियांत्रिकी स्थापत्य केंद्र (एएएसके) आयोजित विशेष संवादसत्रात अभियांत्रिकी क्षेत्रातील अनुभवी मान्यवर अभियंते सहभागी झाले होते. विवेक गाडगीळ यांच्यासह बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजीचे उपाध्यक्ष आर. बी. सूर्यवंशी, प्रीकास्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक कपिलेश भाटे, या तज्ज्ञांनी यावेळी उद्योगविश्व आणि शैक्षणिक संस्था यांना पूरक ठरणाऱ्या अभ्यासक्रमांचे सक्षमीकरण, कौशल्य विकास, मनुष्यबळविकास आदी मुद्यांवर मांडणी केली. अभियंता मनोज देशमुख यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी 'एएएसके'चे आजीव विश्वस्त नीलकंठ जोशी, संजय वायचळ, जयदीप राजे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अभिनव अभियंत्रिकी स्थापत्त्य केंद्रामार्फत आरएमसी प्लांट मॅनेजमेंट (१०० दिवसांचा अभ्यासक्रम) आणि इंडस्ट्री रेडीनेस प्रोग्रॅम हे दोन नवीन त्रिस्तरीय अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले.

विवेक गाडगीळ म्हणाले, "दिवसेंदिवस बांधकामविश्वातील प्रकल्पनिर्मिती गुंतागुंतीची होत आहे. वेळ कमी आणि प्रकल्प महाकाय, असे चित्र आहे. यामध्ये समतोल साधण्यासाठी कुशल तसेच प्रशिक्षित मनुष्यबळ पुरवणाऱ्या 'एएएसके'सारख्या संस्थांना पाठबळ दिले पाहिजे, तरच आपण स्केल आणि स्कील, यांच्यात मेळ साधू शकतो. आपल्याकडे वारेमाप अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली जातात, पण उद्योगाला ज्यांची सर्वाधिक गरज आहे, असे फोरमन, डिझाईनर्स, क्वॉलिटी कंट्रोलर्स, साईट व्यवस्थापक, मशीनरी हाताळणारे कुशल लोक मिळत नाहीत, ही शोकांतिका आहे. पूर्वी हे सर्व घटक, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे भाग होते, आता ते नसल्याने उद्योगविश्व आणि शैक्षणिक संस्था, यात अंतर वाढले आहे."

आर. बी. सूर्यवंशी म्हणाले, "वेगाने विकसित होणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत बांधकाम क्षेत्राचा वाटा तब्बल ८ ते १० टक्के आहे. पायाभूत सुविधांचा विकास अधिक गतीने सुरू राहणार असून, काम उपलब्ध मात्र ते उत्तम पद्धतीने करणारे कुशल, प्रशिक्षित मनुष्यबळ कमी, असा विरोधाभास दिसत आहे. स्थापत्य अभियांत्रिकीप्रमाणेच मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल अभियंत्यांचीही गरज या क्षेत्रात आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे यांत्रिक व तांत्रिक सुविधा, उपकरणांत वेगाने वाढ होत आहे, पण पारंपरिक अभ्यासक्रमांत हे विषय शिकवले जात नसल्याने अभियंत्यांनाही नव्याने प्रशिक्षित करण्याची गरज आहे."

कपिलेश भाटे यांनी कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव, हा जागतिक प्रश्न झाल्याचा उल्लेख केला. अनेक देशांत त्यासाठी मनुष्यबळ मंत्रालये कार्यरत आहेत. मात्र सध्याच्या नव्या पिढीला कमी काम, कमी वेळाचे काम आणि मोबदला मात्र अधिक, अशा कामाची अपेक्षा असल्याचे चित्र आहे. संघर्ष, परिश्रम न करता सारे काही सहज मिळावे, ही मानसिकता बदलण्याची गरज, त्यांनी बोलून दाखवली.

संवादसत्रानंतर उपस्थितांसह प्रश्नोत्तरेही झाली. त्यातून अनेक सूचना पुढे आल्या. 'एएएसके'चे विभागप्रमुख अशोक आव्हाड यांनी अभिनव अभियांत्रिकी स्थापत्य केंद्रातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. शौनक दबडघाव यांनी सूत्रसंचालन केले. जयदीप राजे यांनी आभार मानले.

## वसुली दरम्यान महिला वीज कर्मचाऱ्यास धक्काबुक्की

पुणे (दै. संध्या)

■ लोणावळा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

वसुलीसाठी गेलेल्या महिला वीज कर्मचाऱ्याला शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी लोणावळा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे परिमंडलात महावितरण कंपनीची वीजबिल वसुली मोहीम जोरदार सुरू आहे. सोमवारी (दि.१६) दुपारी २.१० च्या सुमारास रवी पांगोळी सोसायटीमध्ये अनिकेत मालपुटे या कंत्राटी कामगारासह महिला वरिष्ठ तंत्रज्ञ करिश्मा मुकेश पाटील वसुलीसाठी गेल्या होत्या. शाम रामचंद्र पवार यांच्या नावाने असलेल्या वीज कनेक्शनचे फेब्रुवारीचे ९८० रुपये व मार्च महिन्याचे ९९० रुपये थकीत होते. करिश्मा पाटील यांच्या सांगण्यावरून अनिकेत मालपुटे कनेक्शन तोडत होते. त्यावेळी स्वतः ला मालक म्हणून सांगणाऱ्या जयनिल दोशी याने अनिकेतला विरोध केला. तेंव्हा करिश्मा पाटील स्वतः कनेक्शन तोडू लागल्या. त्यावेळी जयनिल दोशी याने त्यांना अटकाव करत श्रीमती पाटील यांना मागे ओढून जोरात धक्का दिला, ज्यामुळे त्या खाली पडल्या. इतकेच नाही तर, आरोपीने त्यांच्या सहकाऱ्याच्या दुचाकीची चावी काढून घेऊन त्यांना तिथून जाण्यास मज्जाव केला आणि वाद घातला. त्यामुळे करिश्मा पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून, लोणावळा शहर पोलिसांनी आरोपी जयनिल दोशी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२१ अन्वये सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

## ओएक्सएमआयक्यू लॅब्ज आणि एएम इंटेलिजन्स लॅब्ज यांची भागीदारी

मुंबई (दै. संध्या)

जीपीयू आर्किटेक्चर आणि राजा कोडुरी यांनी स्थापना केलेली एआय तंत्रज्ञान कंपनी ओएक्सएमआयक्यू लॅब्ज ("ओएक्सएमआयक्यू") ने आज एएम ग्रुपचा व्यवसाय विभाग असलेल्या एएम इंटेलिजन्स लॅब्ज ("एएमआय लॅब्ज") सोबत एक धोरणात्मक तंत्रज्ञान भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारी अंतर्गत एएमआय लॅब्जच्या 2030 पर्यंतच्या 2 GW एआय कॉम्प्युट क्षमतेसाठी डेटा सेंटर आणि प्रणाली पायाभूत सुविधांबाबत सल्लागार सेवा पुरवण्यात येणार आहेत. यामध्ये भारतातील उत्तर प्रदेशमध्ये 1 GW क्षमतेचा प्रारंभिक एआय कॉम्प्युट हब उभारला जाणार आहे.

एएमआय लॅब्ज हा एएम ग्रुपचा धोरणात्मक व्यवसाय विभाग आहे. एएम ग्रुप ही ग्रीनकोची मूळ कंपनी आहे. ग्रीनको ही भारतातील सर्वात मोठी हरित ऊर्जा उत्पादक कंपनी असून त्यांच्याकडे सौर, पवन आणि




जलऊर्जा क्षेत्रात 50 GW अक्षय ऊर्जा क्षमतेचा पोर्टफोलिओ आहे. त्याला 100 GWh इंटेलीजंट ऊर्जा साठवणुकीचे पाठबळ असून कंपनी भारताच्या एकूण वीजपुरवठ्यापैकी सुमारे 2% वीज पुरवते. पारंपरिक डेटा सेंटर वीजखर्चापेक्षा 50–70% कमी किमतीत उपलब्ध अशी कंपनीच्या मालकीची ऊर्जा असून ती कार्यान्वित केली जाते आणि कार्बनमुक्त आहे.

भारत वेगाने एआय वापर आणि टोकन वापराच्या दृष्टीने जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. त्यायोगे जागतिक एआय अर्थव्यवस्थेत देश एक महत्त्वाचे मागणी केंद्र बनत आहे. मोठ्या विकसक परिसंस्थेमुळे, डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे आणि उद्योग क्षेत्रात एआयचा जलद वाढणारा स्वीकार यामुळे ही वाढ होत आहे.

एएम ग्रुपने त्यांच्या प्रमुख एआय पायाभूत सुविधा उपक्रमाचा विकास सुरू केला असून त्यामध्ये नॉयडा कॉम्प्युट हबची फेज 1 सध्या सक्रिय अंमलबजावणी टप्प्यात आहे. 2027 च्या अखेरीस प्रारंभिक कॉम्प्युट क्षमता ऑनलाइन आणणे हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल कारण ग्रुप जगातील सर्वात मोठ्या अक्षय ऊर्जेवर चालणाऱ्या एआय कॉम्प्युट प्लॅटफॉर्मपैकी एक उभारत आहे. प्रणाली आर्किटेक्चर, पायाभूत सुविधा डिझाइन आणि मॉड्युलर अंमलबजावणी वितरण यांचे ऑप्टिमायझेशन करण्यासाठी ओएक्सएमआयक्यू एएम ग्रुपसोबत जवळून काम करत आहे. त्यायोगे हा प्लॅटफॉर्म जलद गतीने कार्यरत होईल आणि उत्कृष्ट कार्यक्षमता व मोठ्या प्रमाणावर विस्तार साध्य करता येईल.

या भागीदारी अंतर्गत ओएक्सएमआयक्यू कॉम्प्युट प्लॅटफॉर्मसाठी आर्किटेक्चर आणि अभियांत्रिकी भागीदार म्हणून काम करेल. ते एएमआय लॅब्जसोबत मिळून प्रणाली आर्किटेक्चर, हार्डवेअर रोडमॅप आणि पुरवठा साखळी धोरण डिझाइन करतील.

## एनएआर-इंडियाचे वार्षिक अधिवेशन; ₹३००० कोटींच्या व्यवहारांची अपेक्षा

पुणे (दै. संध्या)




देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी प्रमुख संस्था एनएआर-इंडिया यावर्षी मुंबईमध्ये आपले वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करत आहे. या अधिवेशनातून सुमारे ₹3000 कोटींच्या व्यावसायिक व्यवहारांची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या कार्यक्रमात रिलायन्स, टाटा, बिर्ला यांसारख्या देशातील प्रमुख उद्योगसमूहांसह अनेक राष्ट्रीय रिटेल ब्रँड्स सहभागी होणार आहेत. देशभरातून सुमारे 1800 हून अधिक सहभागी या अधिवेशनात उपस्थित राहणार असून यामध्ये डेव्हलपर्स, गुंतवणूकदार, रिअल्टर्स, मालमत्ता मालक, वित्तीय संस्था आणि कॉर्पोरेट प्रतिनिधींचा समावेश असेल. या अधिवेशनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे निवासी, व्यावसायिक आणि रिटेल क्षेत्रात नेटवर्किंग, सहकार्य आणि मोठ्या प्रमाणावर व्यवहारांना चालना देणे आहे. विशेष म्हणजे, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक संधींचा शोध घेणाऱ्या प्रमुख कॉर्पोरेट्सच्या सहभागामुळे या अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमात अभिनेते बोमन इराणी आणि आध्यात्मिक वक्त्या जया किशोरी उपस्थितांना संबोधित करणार आहेत. तसेच उद्योग क्षेत्रातील मान्यवरांमध्ये डॉ. निरंजन हिरानंदानी, वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर, शेखर पटेल आणि पद्मश्री सवजी ढोलकिया यांचा समावेश आहे. एनएआर-इंडियाचे पदाधिकारी सुमंत रेड्डी यांनी सांगितले की, "रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वास, नेटवर्किंग आणि सहकार्याच्या माध्यमातून मूल्यनिर्मिती होत आहे. अशा अधिवेशनांमुळे चर्चा थेट व्यवहारांमध्ये रूपांतरित होतात." तर अध्यक्ष-नियुक्त चंद्रेश विठलानी यांनी या अधिवेशनामुळे रिअल इस्टेट ब्रोकरेज क्षेत्रातील व्यावसायिकता वाढीस लागेल आणि देशभरात पारदर्शक व्यवहारांना चालना मिळेल, असे मत व्यक्त केले. अधिवेशनाचे संयोजक आशीष मेहता यांनी सांगितले की, हा कार्यक्रम रिअल इस्टेट व्यावसायिकांना डेव्हलपर्स, कॉर्पोरेट्स आणि गुंतवणूकदारांशी जोडण्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. हे अधिवेशन एरिया ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात येत असून ४५ सदस्यांची आयोजन टीम त्यासाठी कार्यरत आहे. या कार्यक्रमाद्वारे उद्योगातील संबंध अधिक मजबूत होण्याबरोबरच भारतीय रिअल इस्टेट क्षेत्राला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## पर्यटन विकास रखडला; डॉ. गोऱ्हे यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा आणि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या प्रमुख पर्यटन स्थळांकडे पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. भारतीय पुरातत्व विभाग (ASI) आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वयाचा अभाव, तसेच मूलभूत सुविधांची दुरवस्था यामुळे जिल्ह्याचा पर्यटन विकास रखडला असून, याप्रकरणी विधान परिषदेच्या उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या निवेदनात पुराव्यांसह माहिती दिली आहे की, एकेकाळी पर्यटकांचे मुख्य आकर्षण असलेल्या शनिवारवाड्याला २०१७-१८ मध्ये १४ लाख २४ हजार पर्यटकांनी भेट दिली होती. मात्र, ही संख्या आता लक्षणीयरीत्या घटली आहे. येथील प्रसिद्ध 'लाईट अँड साऊंड शो' तांत्रिक कारणास्तव आणि निधीअभावी बंद असल्याने पर्यटकांचा हिरमोड होत आहे. केवळ शनिवारवाडाच नव्हे, तर पावसाळ्यात पर्यटकांनी गजबजणाऱ्या लोहगड किल्ल्यावरही पर्यटकांची संख्या ४० टक्क्यांनी घटली आहे. कार्ले-भाजे लेणी आणि आगाखान पॅलेस या ठिकाणीही महसुलात मोठी घट झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

### एका अनिश्चित जगामध्ये पोर्टफोलिओ नव्याने संतुलित करताना स्मॉल कॅप कंपन्यांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे

# नेट्टो इन्व्हेस्टमेंट्सचे प्रोप्रायटर संताना आफ्रा नेट्टो यांचे मत

पुणे (दै. संध्या)

जागतिक बाजारपेठा पुन्हा एकदा वाढत्या अनिश्चिततेच्या काळातून मार्गक्रमण करत आहेत. वारंवार तयार होणारे भौगोलिक राजकीय ताणतणाव आणि व्यापाराच्या बदलत्या दिशा इथपासून ते सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये व्याजदराच्या चक्रात होणाऱ्या चढउतारांपर्यंत सर्वत्र गुंतवणूकदार अशा एका वातावरणात काम करत आहेत, जे अगदी काही वर्षांपूर्वीच्या परिस्थितीच्या तुलनेत खूपच कमी भरवशाचे राहिले आहे. अशा काळामध्ये, पोर्टफोलिओचे पुन:संतुलन म्हणजे रिबॅलन्सिंग हे केवळ धोरण उरलेले नाही तर ती एक गरज बनली आहे. दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी रिबॅलन्सिंगचा अर्थ बाजाराच्या बदलत्या वास्तवांशी आपल्या गुंतवणुकींचा मेळ साधणे व हे करताना दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवरील लक्ष ढळू न देणे असा होतो. आज अनेक पोर्टफोलिओज हे पारंपरिक लार्ज कॅप कंपन्यांतील गुंतवणुकीच्या दिशेने मोठ्या प्रमाणात झुकलेले आहेत, ऐतिहासिकदृष्ट्या त्यांनी खळबळीच्या टप्प्यामध्ये चांगले स्थैर्य दिले आहे. मात्र जागतिक परिस्थिती बदलत असताना

इथेच रिबॅलन्सिंग महत्त्वाची भूमिका बजावते. सध्याच्या जागतिक संदर्भात, जिथे अनिश्चितता हे वारंवार उद्भवणारे सूत्र ठरणार आहे, तिथे स्थैर्य व वाढीची शक्यता यांना एकत्र आणणारे पोर्टफोलिओ आवर्तनांतून मार्ग काढण्याच्या दृष्टीने अधिक चांगल्या स्थितीत असणार आहेत. लार्ज कॅप्स लवचिकता व सातत्य पुरवू शकतील, तर स्मॉल कॅप्समुळे उदयोन्मुख संधी आणि दीर्घकालीन वाढीच्या संधी मिळू शकतील. यातील रोचक भाग म्हणजे या विभागावर अधिक भर दिला जाणे हे बाजारात किती नव्या ऑफरिंग्जचा प्रवेश होत आहे, याचेही द्योतक आहे. नव्या युगातील असेट मॅनेजमेंट कंपन्या उद्याच्या उदयोन्मुख व्यापारी कंपन्या शोधण्याचे लक्ष्य बाळगणारी धोरणे सक्रियपणे आखत आहेत. उदाहरणार्थ, द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडने अलीकडेच द वेल्थ कंपनी स्मॉल कॅप फंड बाजारात आणला. बाजारपेठेच्या नेतृत्वाची पुढची लाट ही स्मॉल कॅप विश्वाची असणार आहे यामध्ये वाढता विश्वास त्यातून दिसून आला.

आणि भारताची आर्थिक आगेकूच ठामपणे सुरू असताना, आता कदाचित गुंतवणूकदारांनी आपल्या पोर्टफोलिओच्या मांडणीकडे पुन्हा एकदा पाहण्याची वेळ आलेली आहे. नव्याने लक्ष द्यायला हवे असा एक गट म्हणजे स्मॉल कॅप क्षेत्र : स्मॉल कॅप कंपन्या नेहमीच अर्थव्यवस्थेच्या सर्वात गतीशील भागाचे प्रतिनिधीत्व करतात. या व्यापारी संस्था सर्वसाधारणपणे आपल्या वाढीच्या आवर्तनाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर असतात व उत्पादनाचा विस्तार, डिजिटल तंत्रांचा अंगिकार, पायाभूत सोयीसुविधांचा विकास आणि वाढती देशांतर्गत खरेदी यांसारख्या संरचनात्मक बदलांचा लाभ घेणाऱ्या क्षेत्रांमध्ये त्या कार्यरत असतात. भारत वेगाने वाढणाऱ्या काही प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून आपले स्थान निर्माण करत असताना अनेक उदयोन्मुख कंपन्यांना आपली व्याप्ती वेगाने वाढविण्याची संधी आहे.

त्याचवेळी, स्मॉल कॅप कंपन्या छोट्या कालावधीत अधिक अस्थिर असतात हे मान्य करणेही महत्त्वाचे आहे. बाजारपेठेची परिस्थिती बरेचदा या विभागावर लार्ज कॅप कंपन्यांपेक्षा अधिक तीव्रपणे परिणाम करते. नेमक्या याच कारणास्तव संतुलित दृष्टिकोन अत्यावश्यक बनून जातो. गुंतवणूकदारांनी स्मॉल कॅप कंपन्यांकडे स्वतंत्र गुंतवणूक म्हणून बघण्याऐवजी त्याकडे एका विविधीकृत पोर्टफोलिओमधील एक धोरणात्मक हिस्सा म्हणून पाहिले पाहिजे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मंगळवार पेठेत दारूच्या दुकानामुळे वाहतूक कोंडी आणि नागरिकांना त्रास



पुणे (दैनिक संध्या) : मंगळवार पेठ येथील अमर वाईन शॉप बंद करावा किंवा स्थलांतरित करावा या संदर्भाचे निवेदन पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे स्थानिक नगरसेविका कल्पनाताई दिलीप बहिरट यांनी दिले. या दारूच्या दुकानामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते तसेच ज्येष्ठ नागरिकांना तसेच परिसरातील नागरिकांना प्रचंड प्रमाणात त्रास होतो. महिलांना सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गुन्हेगारी वाढल्यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. हे दुकान कायमस्वरूपी बंद करावा अथवा दुसरीकडे स्थलांतरित करावे अशा आशयाचे निवेदन नगरसेविका कल्पनाताई बहिरट यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. यावेळी परिसरातील स्थानिक नागरिक महिला, पुरुष, मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर दारूचे दुकान बंद करण्यासाठी 13 मार्च रोजी समर्थ पोलीस ठाण्यासमोर नगरसेविका कल्पनाताई बहिरट यांनी धरणे आंदोलन केले होते.




### तब्बल 35 मोबाईल चोरणाऱ्या अट्टल चोरट्यास सापळा रचून आवळल्या मुसक्या

पुणे (दैनिक संध्या) : वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्मी नगर पोलीस स्टेशन च्या हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान पोलीस अंमलदार कादिर शेख व पोलीस अंमलदार अतुल जाधव यांना त्यांच्या गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, एक इसम येरवडा येथील शादल बाबा चौक कमानीजवळ मोबाईल विक्रीकरिता येणार आहे. ही बातमी तपास अधिकारी रविकांत नंदनवार सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना सांगितली सदरची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदनवार यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांना लगेच कळवली, या बातमीचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार, पोलीस अंमलदार कादिर शेख, अतुल जाधव, कांबळे, अक्षय शिंदे, राहुल परदेशी, अमोल गायकवाड, सुरज ओंबासे यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जाऊन आडोशाला उभे राहून पाहणी केली पाहणी केल्यानंतर सदर इसमावर त्यांना संशय आला, लगेचच त्या इस बाला पोलिसांनी हटकले त्यानंतर तो इसम कावरा बावरा होऊन तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला वरील स्टाफ ने त्याला पकडून त्याची विचारपूस केली त्या इसमाने त्याचे नाव विष्णू रतनलाल मावर राहणार समाधान चौक ससून हॉस्पिटल येथे राहत असूनअसे मूळ गाव गड अमावरा ,राजस्थान असे त्याने सांगितले. त्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक सॅमसंग कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल फोन मिळून आल्याने त्याला पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असता त्याच्याकडून आणखी ३४ मोबाईल हस्तगत करण्यात आले असे एकूण विष्णू रतनलाल मावर याच्याकडून तब्बल ३५ मोबाईल फोन जप्त करण्यात आले. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त रजनीकांत चुलमुला, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली, तब्बल ३५ मोबाईल फोन पोलिसांनी चोरट्याकडून हस्तगत केल्याने सर्व सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### प्रा. स्मिता देशमुख यांना 'औषधनिर्माणशास्त्र' मध्ये पीएच.डी. प्रदान



सासवड (दैनिक संध्या) : सासवड येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्मिता मधुकर देशमुख यांना 'फार्मास्युटिकल सायन्स' या विषयात डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. स्मिता देशमुख यांनी 'क्राफटींग हर्बल ट्रीटमेंट फॉर इफेक्टीव रिलाइफ इन रिकरंट अॅफ्थस स्टोमाटायटिस' या विषयावर आपले सखोल संशोधन पूर्ण केले. वारंवार होणाऱ्या तोंडाच्या अल्सरवर (फोडांवर) प्रभावी आणि सुरक्षित आराम देणारे 'हर्बल' (नैसर्गिक) उपचार तयार करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. राजस्थानमधील' अलवार युनिव्हर्सिटी'तर्फे त्यांना हा बहुमान मिळाला आहे. या संशोधनासाठी त्यांना पुण्यातील बेल्हे येथील समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्रा. डॉ. कुलदीप रामटेके आणि सासवड महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गेल्या १४ वर्षांपासून अध्यापन आणि औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. स्मिता देशमुख यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी राहिली आहे. आतापर्यंत त्यांचे २२ शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले आहेत. तसेच, त्यांच्या नावावर एक पेटंट नोंदणीकृत असून त्यांनी दोन पुस्तकांसाठी प्रकरणांचे लेखनही केले आहे. यापूर्वी त्यांनी बारामतीतील शारदानगर येथील 'स्कूल ऑफ फार्मसी' आणि पुण्यातील 'इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी' येथेही आपली सेवा दिली आहे डॉ. देशमुख यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जवाहरलाल विद्यालय, केडगाव (ता. दौंड) येथे झाले. त्यानंतर त्यांनी सासवडच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे महाविद्यालयातून बी.फार्म.सी आणि पुण्यातील शिवाजीनगर येथील 'ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी' महाविद्यालयातून एम.फार्मसी पूर्ण केले. सध्या त्या सासवडमध्ये अध्यापनासोबतच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाजकार्यातही हिरीरीने सहभागी असतात. त्यांच्या या यशाबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### गॅस टंचाईला शोधला ऑइल शेगडीचा पर्याय

नारायणगाव (दैनिक संध्या) : गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमती आणि विस्कळीत पुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील हॉटेल व्यावसायिकांनी कमी खर्चात चालणाऱ्या काळ्या ऑइलवरील शेगड्यांचा पर्याय स्वीकारला आहे. हॉटेल व्यवसायात दररोज मोठ्या प्रमाणावर गॅस लागत आहे.मात्र गॅसचे दर वाढल्यामुळे छोट्या व मध्यम हॉटेल चालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. यावर उपाय म्हणून सदा पाटे यांसारख्या हॉटेल व्यावसायिकांनी ऑइल शेगड्यांकडे मोर्चा वळवला आहे. या शेगड्यांमध्ये वापरले जाणारे काळे ऑइल स्वस्त असून त्यातून मिळणाऱ्या अधिक उष्णतेमुळे अन्न शिजवणे सोपे जाते. असे स्वयंपाकी रसाळ यांनी सांगितले.काही हॉटेल व्यावसायिक तर गॅस टंचाईमुळे हॉटेल मध्ये फक्त मसालेभातच शिजवून ग्राहकांना देऊ लागले आहेत.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शेती विकासाला चालना

नाझरे सुपे (दै. संध्या)



पुरंदर व हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी सासवड येथे १ ते ४ मे दरम्यान 'पुरंदर अॅग्रो एक्स्पो २०२६' या भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती माजी आमदार तथा भाजपा पश्चिम महाराष्ट्रचे चिटणीस संजयजी चंदुकाका जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला पंचायत समिती सदस्य माऊली यादव, धालेवाडीचे माजी सरपंच संभाजीनाना काळाणे, माजी पंचायत समिती सदस्य सुनिता कोलते आदी उपस्थित होते. सासवड येथील शरद कृषी व पर्यावरण संस्थेमार्फत यापूर्वीही कृषी प्रदर्शनांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. सन १९९७ मध्ये पुरंदर हायस्कूल येथे पहिले प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यानंतर २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानात मोठ्या प्रमाणावर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

पुरंदर तालुका हा अवर्षणप्रवण असून सरासरी सुमारे ४५० मिमी पर्जन्यमान असल्यामुळे जलसंधारण, पाणी व्यवस्थापन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पन्न मिळवावे, यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

तालुक्यातील शेतकरी पारंपरिक शेतीतून आधुनिक तंत्रज्ञानाकडे वळत असून कृषी यांत्रिकीकरण, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मशरूम उत्पादन, प्रक्रिया उद्योग व कोल्ड स्टोरेज यांसारख्या पूरक व्यवसायांना चालना मिळत आहे. तसेच शेतकरी बचत गट व उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.

'शाश्वत कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठान'मार्फत पोढे, रिसे पिसे, नारायणपूर, पिंपरी, धनकवडी तसेच हवेली तालुक्यातील वरवंड, मालखेड, खामगाव मावळ येथे शेततळे, सिमेंट बंधारे व विविध जलसंधारण प्रकल्प राबविण्यात आले आहेत. त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत झाली आहे.

संस्थेमार्फत सेंद्रिय शेती, ठिबक व तुषार सिंचन, कमी पाण्यात अधिक उत्पादन याबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. मागील तीन वर्षांत सहा गावांमध्ये कृषी भवन उभारण्यात आली असून येथे स्वयंचलित हवामान केंद्र, पर्जन्यमापक यंत्रणा व बाजारभाव माहिती उपलब्ध करून दिली जाते.

या प्रदर्शनात कृषी यांत्रिकीकरण, सुधारित बियाणे, रासायनिक व जैविक खते, कीटकनाशके यांसह विविध राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असणार आहे. तसेच पशुपालन व कुक्कुटपालनाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेष म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करून शेती उत्पादनात वाढ कशी करता येईल, यावर विशेष भर दिला जाणार आहे.

> "पुरंदर व हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवावे, उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पन्न मिळवावे, तसेच प्रदर्शनातील माहितीचा प्रत्यक्ष शेतात वापर करून कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा लाभ घ्यावा," असे संजय आनंदी चंद्रकांत जगताप माजी आमदार पुरंदर हवेली मतदार संघ चिटणीस-भाजपा पश्चिम महाराष्ट्र यांनी सांगितले.

## पुणे महानगरपालिकेच्या 'प्रशासकीय अनागोंदी'मुळे वाघोलीकर वेठीस

पुणे (दै. संध्या)

- १८-१९ किलोमीटरचा प्रवास लादल्याने संतापाची लाट
- नगर रोड-येरवडा क्षेत्रीय कार्यालय पुनर्रचना
- 'सेवा' की 'शिक्षा'? नागरिकांकडून जुनीच व्यवस्था कायम ठेवण्याची मागणी

**चंद्रकांत जगधने आणि मोहल्ला कमिटीचा एल्गार**

> या अन्यायी निर्णयाच्या विरोधात आता सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत जगधने आणि स्थानिक मोहल्ला कमिटीने कंबर कसली आहे. "प्रशासनाने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. १३-१४ किलोमीटरच्या परिघात उत्तम काम करणारी व्यवस्था मोडीत काढून, नागरिकांवर १९ किलोमीटरचा प्रवास लादणे म्हणजे प्रशासकीय अपयश आहे," अशी उघड टीका जगधने यांनी केली आहे. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, ही नवीन पुनर्रचना तातडीने रद्द करावी आणि नागरिकांच्या सोयीची जुनीच व्यवस्था बहाल करावी.

पुणे महानगरपालिकेने नगर रोड आणि येरवडा क्षेत्रीय कार्यालयांच्या रचनेत नुकताच एक अत्यंत अविचारी बदल केला असून, हा बदल वाघोली आणि परिसरातील हजारो नागरिकांसाठी डोकेदुखी ठरला आहे. प्रशासनाने कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता किंवा स्थानिक नागरिकांशी कोणतीही चर्चा न करता, वाघोलीसह परिसरातील प्रभागांना थेट १८ ते १९ किलोमीटर अंतरावरील येरवडा क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि नागरिकांच्या सोयीच्या धोरणावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मूळात क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना नागरिकांना प्रशासकीय सेवा स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने करण्यात आली होती. मात्र, काटकेवाडी ते येरवडा हे १८ ते १९ किलोमीटरचे अंतर पाहता, प्रशासनाचा हा निर्णय उद्देशालाच हरताळ फासणारा आहे. वाघोलीतील एखाद्या सामान्य नागरिकाला जर मालमत्ता कर, जन्म-मृत्यू दाखले किंवा इतर साध्या प्रशासकीय कामांसाठी येरवडा कार्यालयात जावे लागले, तर प्रवासातच त्यांचा अर्धा दिवस आणि इंधनाचा मोठा खर्च वाया जाणार आहे. हे वास्तव लक्षात घेता, प्रशासनाचा हा बदल 'सेवा' देण्याऐवजी नागरिकांना 'शिक्षा' देणाराच असल्याचे स्पष्ट होत आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग बांधवांना बसत आहे. आधीच वाहतूक कोंडीच्या समस्येने ग्रासलेल्या पुणे शहरात १९ किलोमीटरचा प्रवास करणे हे अत्यंत त्रासदायक आहे.

प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाले असून, "आम्ही कर भरतो ते प्रशासकीय सुविधा सोप्या होण्यासाठी की त्रास सोसण्यासाठी?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र वाढल्यास स्थानिक पातळीवर होणाऱ्या विकासकामांवर त्याचे गंभीर परिणाम होणार आहेत. क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा कार्यक्षेत्राशी थेट संपर्क तुटल्यामुळे कचरा व्यवस्थापन, रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सोयींच्या तक्रार निवारणात विलंब होणार आहे. स्थानिक परिस्थितीची जाण नसलेल्या कार्यालयातून सेवा दिल्यास कामात चुका होणे स्वाभाविक आहे, ज्यामुळे विकासकामांची गती पूर्णपणे मंदावेल. जर प्रशासनाने या जनभावनेची दखल घेतली नाही आणि हा अविचारी निर्णय मागे घेतला नाही, तर येणाऱ्या काळात पुणे महानगरपालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांच्या हक्कासाठी आणि सोयीसाठी आता वाघोलीकर एकवटले असून, प्रशासनावर लोकशाही मार्गाने दबाव निर्माण करण्यासाठी मोहल्ला कमिटी सज्ज झाली आहे. आता पालिकेचे आयुक्त यावर कोणता निर्णय घेतात आणि नागरिकांना दिलासा मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## गुळुंचे राजेवली राजेबागसार बाबांचा उरुस उत्साहात

**विविध धार्मिक कार्यक्रमासह; भंडाऱ्याचा लाभ**

नीरा (दै. संध्या)

हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरतपीर राजेवली राजेबागसार बाबांचा उरुस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुळुंचे (ता. पुरंदर) येथील गावच्या पूर्वेकडील टेकडीवरील दर्ग्यावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

हजारो भाविकांनी उरुसा निमित्त पंगतीत बसुन भंडाऱ्याचा लाभ घेतला. उत्सवा निमित्त गुरवारी दर्ग्याला (चुना) रंगरंगोटी करण्यात आली, शुक्रवारी संदल लावण्यात आले. शनिवार दि.१४ रोजी मुख्य उरुस साजरा करण्यात आला. उरुसा दिवशी सायंकाळी लंगर (भंडारा) आयोजित केला होता. परिसरातील शेकडो हिंदू, मुस्लिम भाविकांनी टेकडीवरील दर्ग्याचे दर्शन घेऊन, पंगतीत बसुन भंडाऱ्यातील गोड भोजनाचा स्वाद घेतला. रविवारी सकाळी अकरा वाजता जियरतीने उरसाची सांगता करण्यात आल्याची माहिती मुबारक मुलाणी यांनी दिली.

> या उत्सवा निमित्त हिंदू मुस्लिमांचे ऐक्य गुळुंचे सारख्या ग्रामीण भागात दिसुन आले. या उरुसा दरम्यान नीरा, राख, कर्नलवाडी, सोमेश्वर, निंबूत, खंडोबाचीवाडी, पिंपरे खुर्द आदि परिसरातील अनेक भाविकांनी दर्शन घेतले. हा उरुस साजरा करण्यासाठी गुळुंचे गावातील मुस्लिम समाजातील मुलाणी, सय्यद, आतार व अमिनगड कुटुंबीयातील सदस्यांसह हिंदू समाजातील हर हर महादेव मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कष्ट घेतले.

## शिक्रापूर ते मलठण रस्त्याची अनेक ठिकाणी वाताहत

कवठे येमाई (दै. संध्या)




शिरूर तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व शिरूरच्या बेट भागातून पुण्याकडे जाणाऱ्या वाहनासाठी शिक्रापूर ते मलठण या मार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून होणा-या रस्ता नूतनीकरणाच्या कामामुळे या रस्त्याची अनेक ठिकाणी वाताहात झाली असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सदर रस्त्याच्या कामासाठी मातीचा वापर केला जात असल्याने निर्माण होणाऱ्या फुफाटा व धुळीमुळे दैनंदिन जीवनावर देखील मोठा परिणाम होत असल्याची खंत वाघाळे गावाचे सामाजिक कार्यकर्ते,विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक अशोकराव सोनावणे पाटील व परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.सदर रस्त्याच्या कामासाठी मुरुमाचा वापर करून त्यावरती दररोज सकाळी आणि संध्याकाळी पाणी मारण्याची व्यवस्था करणे अपेक्षित असताना ते दिले जात नाहीत. रस्त्याचे काम सुरु असल्याबाबत च्या सूचना संबंधित ठेकेदार यांनी तसे फलक लावून दिल्या पाहिजेत. तसेच दुसरा पर्यायी रस्ता स्थानिक नागरिकांना नसल्याने काम चालू असलेल्या रस्त्यावरुनच विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेज तसेच नागरीकांना दुग्ध,शेतमालाची वाहतूक करावी लागत आहे. या परीसरात कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ठेकेदार यांना वेळोवेळी या अडचणींची कल्पना देऊनही ठेकेदार अडमुठे पणाचे धोरण स्वीकारत असल्याचा आरोप सोनावणे पाटील व नागरिकांमधून केला जात आहे. तर रस्त्याच्या महत्वपूर्ण प्रश्नी संबंधित विभागाचे अधिकारी, ठेकेदार जागे होणार का ? असा प्रश्न नागरिकांच्या मधुन उपस्थित केला जात आहे.

## 'राणा दा'चा आता नवा स्वॅग; 'द ट्रॅप'मध्ये दिसणार हार्दिक जोशीचा भलताच अंदाज

*हार्दिक जोशीसह स्क्रीन शेअर करत द ट्रॅप मधून नवोदित अभिनेता सुजित जाधवची दमदार एंट्री, लूकने वेधलं लक्ष*

पुणे (दै. संध्या)




मराठी सिनेसृष्टीतील चॉकलेट बॉय आणि डॅशिंग अभिनेता हार्दिक जोशी पुन्हा एकदा एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. हार्दिकच्या बहुप्रतिक्षित 'द ट्रॅप' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाचे पहिले पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले असून, या पोस्टरने प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण केली आहे. रहस्यमय कथानक असलेल्या या धमाकेदार पोस्टरने साऱ्यांची उत्सुकता वाढविली आहे. पण ते फक्त एक पोस्टर नाही,तो आहे एका अंधाऱ्या खेळाचा पहिला इशारा. गडद सावल्या,नजरेतलं शांत पण अस्वस्थ करणारं काहीतरी,आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे काहीतरी लपवलं गेलं आहे, जे दिसत नसलं तरी पोस्टर पाहून जाणवतंय. 'द ट्रॅप' नाव साधं,पण अर्थ खोल . ट्रॅप एक असं जाळं ज्यात एकदा अडकला की सुटणं अशक्य...

इथे प्रत्येक पात्र काहीतरी लपवतंय.,प्रत्येक चेहरा खरा आहे की मुखवटा हे ओळखणं कठीण होत जातं, असा अंदाज पोस्टवरुन येतोय.

नुकत्याच समोर आलेल्या पोस्टरमध्ये हार्दिक जोशीचा लूक अत्यंत गंभीर आणि रहस्यमयी दिसत आहे. बॅकग्राउंडला असलेला गडद रंग आणि सस्पेन्सची जोड यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवणारा ठरेल, यांत शंका नाही. या चित्रपटाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, या निमित्ताने सिनेसृष्टीला एक नवा आणि दमदार चेहरा मिळत आहे. अभिनेता सुजित जाधव हे या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत आपले पदार्पण करत आहेत. पहिल्याच चित्रपटात हार्दिक जोशीसारख्या कसलेल्या अभिनेत्यासोबत आणि सस्पेन्स थ्रिलरसारख्या कठीण जॉनरमध्ये काम करण्याची संधी त्याला मिळाली आहे. पोस्टरमधील त्याची झलकही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. याशिवाय चित्रपटात जेष्ठ आणि कसलेले अभिनेते मोहन जोशी, संजय खापरे, श्याम मोहिते, स्वाती लिमये ही कलाकार मंडळी दिसणार आहेत.

> 'द ट्रॅप' चित्रपटाच्या निर्मितीची धुरा निर्माते योगेश रामचंद्र जाधव यांनी सांभाळली आहे. तर याची कथा आणि दिग्दर्शन अमोल लक्ष्मण खापरे यांचे आहे, ही फक्त कथा नाही तर तो प्रेक्षकांच्या मनात जिवंत करणारा भास आहे. तर याची पटकथा संवाद आणि गिते अभिजीत रूपा राजेंद्र कोळेकर यांनी लिहले असून क्रिएटिव्ह दिग्दर्शक निरंजन पत्की यांची चित्रपटाला मोलाची साथ लाभली आहे. मुख्य म्हणजे यात संगीताद्वारे नितीन उगलमुगले यांनी जो जीव ओतला गेला आहे तो कमाल आहे. तर कार्यकारी निर्माता म्हणून रत्नेश पन्हाळकर यांनी जबाबदारी संभाळली आहे . मेकअप ची बाजू विशाखा शिंदे आणि विशाल निघोळ यांनी संभाळली . तर आय फोकस स्टुडिओ (विजय-दिनेश)ने पोस्ट प्रोडक्शन ची धुरा संभाळली. एकूणच या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाबाबत बोलताना हार्दिक जोशी म्हणाला, ""द ट्रॅप' या चित्रपटातून एक वेगळी भूमिका मला साकारायला मिळाली आहे. आजवर अशा प्रकारची सस्पेन्स थ्रिलर दर्शविणारी भूमिका माझ्या वाटेला आली नाही आणि म्हणूनच या संधीचं मी सोनं करायचं ठरवलं. अश्या या चित्रपटात पसरलेलं रहस्याचं जाळं उलगडतांना पाहायला तयार रहा १० एप्रिल २०२६ पासून

# फोर व्हीलर असूनही टू व्हीलरची साथ न सोडणारे कचरू वाघमारे

पुणे (दै. संध्या)

- साधेपणाचा आदर्श : उन्हातान्हात सायकलवर फिरणारा 'फिटनेस फकीर'! कचरू वाघमारे यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास



ऊन असो वा पाऊस, थंडी असो वा उकाडा, आपल्या सायकलसोबतचा जिव्हाळा कधीच खंडित होऊ देत नाही, असा एक अवलिया पुण्याच्या रस्त्यावर फिरतो आहे. हा अवलिया म्हणजे मूळचे पाथर्डी (जि. अहिल्यानगर) येथील आणि सध्या पुण्यात वास्तव्यास असलेले कचरू वाघमारे. वयाच्या साठी ओलांडलेल्या या जिद्दी सायकलस्वाराने आतापर्यंत कधीही गोळी-औषधाचा आधार न घेता केवळ सायकलिंगच्या जोरावर आपले आरोग्य चोख राखले आहे.

कचरू वाघमारे हे गेली अनेक वर्षे सायकलचाच प्रवास सोबती मानून आहेत. ते मुंबई ते पुणे, पुणे ते अहिल्यानगर ते पाथर्डी, असा प्रदीर्घ प्रवास सायकलवरून करतात. पुण्यातील केसनंद, नाना पेठ, पिंपरी चिंचवडमधील रावेत, हिंजवडी, हडपसर ते मुंबई एअरपोर्टपर्यंतचा पल्ला ते सहजगत्या सायकलवर पार करतात. भल्या उन्हातान्हात त्यांना सायकल चालवताना पाहिले की कोणीही त्यांच्या फिटनेसचे कौतुक न करू शकणार नाही.

कचरू आप्पा यांनी आपल्या मुलाला चांगले शिक्षण दिले असून, त्यांचा मुलगा सध्या वाघोलीतील केसनंद भागात मोठे फोर व्हीलर गॅरेज चालवतो. त्यांच्या मुलाकडे स्वतःची फोर व्हीलर वाहने आहेत, तसेच केसनंदमध्ये जमीनही घेतलेली आहे. पारंपरिक दृष्टिकोनातून पाहता, एवढी सुखे असताना, मोठ्या गाड्या उपलब्ध असताना कचरू आप्पा यांनी सायकलची साथ कधीच सोडलेली नाही.

सुवर्णसंधी असूनही त्यांनी मोठ्या वाहनांकडे पाठ फिरवत, सायकलला प्राधान्य दिले आहे. ही बाब त्यांच्या जीवनशैलीची आणि तत्त्वांची मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

पैसा, प्रतिष्ठा, वैभव मिळूनही साधेपणा जोपासणारे कचरू आप्पा आजही पुण्याच्या रस्त्यावर सायकलवरच धावताना दिसतात. त्यांचा हा छंद नसून जीवनपद्धतीच आहे. कचरू वाघमारे सांगतात, "सायकल चालवणे हे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे. यामुळे शरीर सदैव सक्रिय राहते आणि कोणत्याही आजारांपासून दूर राहता येते." त्यांच्या या वक्तव्याची प्रचिती त्यांच्या प्रकृतीवरून येते. एवढ्या प्रदीर्घ प्रवासानंतरही त्यांच्यात चिवटपणा आणि चैतन्य दिसून येते.